शुक्रवार, २१ ऑक्टोबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ९४
www.ramprahar.com
राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

मोदी सरकार करणार १० लाख रिक्त जागांसाठी महाभरती/२
नवी मुंबईकरांवर कचरा वर्गीकरणाचे संस्कार/६
रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल राष्ट्रीय कराटे स्पर्धेत विजयी/८

## रायगड जिल्ह्यातील कागद निर्मिती उद्योगास मान्यता



**मुंबई :** कोविडमुळे मंदावलेला उद्योग क्षेत्राचा वेग वाढवण्यासाठी औद्योगिक प्रोत्साहन अनुदान कालावधी दोन वर्षांनी वाढविण्याचा निर्णय गुरुवारी (दि. २०) उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. बैठकीत रायगड जिल्ह्यातील सिनारमन्स पल्प या कागद निर्मितीच्या २० हजार कोटींच्या गुंतवणुकीच्या उद्योगासह अन्य उद्योग प्रकल्पांनाही मान्यता देण्यात आली. हा आशियातील सर्वांत मोठा कागद निर्मिती क्षेत्रातील उद्योग आहे. हा उद्योग भारतात प्रथमच २० हजार कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक करणार आहे. इंडोनेशियातील हा समूह भारतात पहिल्यांदाच असा प्रकल्प आणि तोही महाराष्ट्रात उभारण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने रायगड जिल्ह्यातील धेरंड येथे या प्रकल्पासाठी यापूर्वीच ३०० एकर जागा देण्यात आहे.

### शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारची नवी योजना

# सॅटेलाईटद्वारे होणार नुकसानीचे पंचनामे

### उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मोठी घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही दिवसांपासून परतीच्या पावसाने थैमान घातले आहे. या पावसामुळे शेतकऱ्यांच्या नाकीनऊ आले आहेत. पिकांची अक्षरशः नासाडी झाली आहे. शेतकऱ्यांच्या सगळ्या आशा सरकारकडे लागून राहिल्या आहेत. त्या अनुषंगाने राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी एका नव्या योजनेची घोषणा केली आहे. शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करण्यासाठी उपग्रह आधारित यंत्रणा करण्यात



येत आहे. त्यानंतर ऑटोपायलट मोडमध्ये विमा रक्कम मिळावी यासाठी तंत्रज्ञान तयार केले जात असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक गुरुवारी (दि. २०) झाली. या बैठकीत पावसामुळे त्रस्त शेतकऱ्यांसाठी निर्णय घेण्यात आले. याविषयी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली आहे.

साडेचार हजार कोटी थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झाले आहेत, तसेच कालपर्यंत झालेल्या अतिवृष्टीच्या नुकसानीची पाहणी करून तत्काळ पंचनामे केले जातील. अहवाल तातडीने पाठवल्यास तातडीने मदत देण्यात येईल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. (पान २ वर...)

### कर्जदारांना दिलासा

*भूविकास बँकेचे कर्ज घेतलेल्या ३४,७८८ कर्जदार शेतकऱ्यांना संपूर्ण ९६४ कोटी १५ लाखांची कर्जमाफी देण्याचा तसेच ही रक्कम भूविकास बँकेकडून शासनास येणे असलेल्या रकमेमध्ये समायोजित करण्यास मान्यता देण्यात आल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले. यामुळे सुमारे ६९ हजार हेक्टर शेतजमिनीवरील भूविकास बँकांच्या कर्जाचा बोजा कमी होणार आहे.*



## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वृक्षदत्तक योजनेचा शुभारंभ

**मोखाडा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात वृक्षदत्तक योजना महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आली असून या योजनेचा शुभारंभ महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २०) महाविद्यालयाच्या प्रांगणात नारळाचे रोप लावून करण्यात आला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भगीरथ शिंदे हे उपस्थित होते. त्याचबरोबर महाविद्यालय विकास समितीचे सदस्य व जि. प. सदस्य प्रकाश निकम, सीए कुणाल लाडे, प्राचार्य डॉ. एल. डी. भोर, उपप्राचार्य एस. इ. संदनशीव तसेच शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

प्रत्येक विद्यार्थ्याला वृक्ष भेट दिले असून त्याचे रोपण व संवर्धन करावयाचे आहे. (पान २ वर...)

## एटीएसची पनवेलमध्ये पुन्हा धडक कारवाई

### पीएफआयच्या सचिवासह तिघांना अटक

**पनवेल : वार्ताहर**

बंदी घालण्यात आल्यानंतरही पनवेलमध्ये पीएफआय संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या हालचाली सुरूच असल्याने गुरुवारी (दि. २०) दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) सचिवांसह तिघांना अटक केली आहे.

पनवेलमधून पीएफआय पनवेलचे सचिव अब्दुल रहीम याकूब सय्यद यांच्यासह सदस्य मोईज मतीन पटेल, मोहम्मद आसिफ खान आणि तन्वीर हमीद खान यांना एटीएसने अटक केली आहे. पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेवर केंद्र सरकारने पाच वर्षांची बंदी घातली आहे.

आयसिस या दहशतवादी संघटनेशी संबंध असल्याचा ठपका ठेवत ही कारवाई करण्यात आलेली आहे. असे असतानाही पीएफआय संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या हालचाली सुरूच आहेत.

पनवेलमध्ये पीएफआय संघटनेची बैठक झाल्याची माहिती एटीएसला मिळाली होती. याच पार्श्वभूमीवर एटीएसने पनवेलमध्ये कारवाई केली आहे.

सप्टेंबर महिन्यापासूनच पीएफआयशी संबंध असलेल्यांवर एटीएस व एनआयएकडून कारवाया सुरू आहेत. त्यानंतर गृह मंत्रालयाने पीएफआयवर पाच वर्षांची बंदी आणली आहे. पीएफआयसोबतच आणखी नऊ संघटनांवरदेखील कारवाई करण्यात आली आहे.

## महाडमधील युनिटी फॅबटॅक कंपनीला आग

**महाड :** महाड एमआयडीसीमधील युनिटी फॅबटॅक इंडस्ट्रीज कंपनीला गुरुवारी (दि. २०) दुपारी उशीरा भीषण आग लागली. या आगीमध्ये जीवितहानी झाली नसली, तरी कंपनीचे कार्पेट गोडाऊन जळून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. दुपारी कारखाना सुरू असताना गोडाऊनला अचानक आग लागली. आग विझवण्यासाठी चार ते पाच अग्निशमन दलाच्या गाड्या प्रयत्न करीत होत्या. आग लागली त्या वेळी करखान्यामध्ये ३० कामगार काम करीत होते. सर्व सुरक्षित असल्याची माहिती कारखाना व्यवस्थापक संदीप पवार यांनी दिली. कारखान्याला आग कशामुळे लागली याचे कारण अद्याप समजलेले नाही.

## निवडक

### मध्य प्रदेशात फटाक्यांच्या गोदामात स्फोट; तिघे ठार

**भोपाळ :** मध्य प्रदेशातील मुरैना येथे फटाक्यांच्या गोदामात झालेल्या स्फोटात तीन ठार तर सातजण जखमी झाले आहे. घटनेची माहिती मिळताच, बचावकार्य युद्धपातळीवर सुरू करण्यात आले आहे. गोदामात काही भाडेकरूही असल्यामुळे काही जण ढिगाऱ्याखाली दबले असण्याची भीती व्यक्त होत आहे.

### ब्रिटनच्या पंतप्रधान लिझ ट्रस यांचा राजीनामा

**ब्रिटन :** ब्रिटनच्या पंतप्रधान लिझ ट्रस यांनी केवळ दीड महिन्यात राजीनामा दिला आहे. लिझ ट्रस सरकारने मांडलेल्या मिनी बजेटनंतर देशभरात कर रचनेवरून संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. त्याची परिणती आता पंतप्रधानांच्या राजीनाम्यात झाली आहे.

## दातार कंपनीला १ नोव्हेंबरपर्यंतचा अल्टिमेटम

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांचा तीव्र आंदोलनाचा इशारा



(छाया : विकास म्हात्रे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दातार ॲण्ड सन्स एक्सपोर्ट कंपनीने १ नोव्हेंबरपर्यंत कामगारांचा प्रश्न मार्गी न लावल्यास आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी दिला आहे.

कसळखंड येथील दातार ॲण्ड सन्स एक्सपोर्ट कंपनीने चार महिला कामगारांना कामावरून काढले होते. कामगारांवर होणाऱ्या या अन्यायाविरोधात गुरुवारी (दि. २०) भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या नेतृत्वाखाली कंपनीसमोर गेटबंद आंदोलन करण्यात आले.

या वेळी जोपर्यंत कामगारांना सन्मानाने आत घेत नाहीत, तसेच त्यांच्या मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत हा गेट उघडणार नसल्याचा आक्रमक पवित्रा आंदोलनकर्त्यांनी घेतला.

अखेर पनवेल तालुका वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या मध्यस्थीने कंपनी प्रशासनासोबत बैठक झाली. या बैठकीत कामगरांचे प्रश्न सोडवण्यात येतील, असे आश्वासन देण्यात आले. (पान २ वर...)

## शेकाप आमदार जयंत पाटीलही जेलमध्ये जाणार

### आमदार महेंद्र दळवी यांची अलिबागमध्ये गर्जना

**अलिबाग : प्रतिनिधी**

शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार विवेक पाटील कर्नाळा बँक घोटाळा प्रकरणात जेलमध्ये आहेत. रायगड जिल्हा मध्यवर्ती बँक घोटाळाप्रकरणी आमदार जयंत पाटीलदेखील लवकरच जेलमध्ये जातील. माझ्याकडे सर्व कागदपत्रे आहेत. विधिमंडळाच्या आगामी नागपूर हिवाळी अधिवेशनात जयंत पाटलांचा हिशेब मांडणार, असा इशारा अलिबागमधील बाळासाहेबांची शिवसेनाचे आमदार महेंद्र दळवी यांनी दिला.

अलिबाग तालुक्यातील वेश्वी ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच गणेश गावडे व नवगावच्या सरपंच प्रियांती घातकी तसेच आघाडीच्या सर्व



उमेदवारांचा सत्कार समारंभ झाला होता. या वेळी आमदार दळवी बोलत होते.

शेकापचे नेते आमदार जयंत पाटील रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या जीवावर उड्या मारतात. या बँकेत मोठा घोटाळा झाला आहे. (पान २ वर...)

## कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांच्याविरोधात आक्षेपार्ह घोषणाबाजी

### उद्धव ठाकरेंच्या पक्षातील ११ जणांवर गुन्हा

**उरण : रामप्रहर वृत्त**

कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांच्याविरोधात आक्षेपार्ह घोषणाबाजी करणाऱ्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील ११ जणांविरोधात न्हावाशेवा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

उरणचे आमदार महेश बालदी यांनी उद्धव ठाकरे यांना निवडणुकीत हरविणार असल्याचे वक्तव्य करून त्यांना थेट आव्हान दिले होते. त्यामुळे संतप्त झालेल्या शिवसैनिकांनी गव्हाणमध्ये बालदी यांच्या आक्षेपार्ह घोषणाबाजी करीत प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले होते.

या आंदोलनाचे फेसबुकवर व्हायरल झालेले व्हिडिओ भाजप वाहतूक सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष हेमंत ठाकूर यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे हेमंत ठाकूर यांनी न्हावाशेवा पोलीस ठाण्यात हे व्हिडिओ सादर करून तक्रार दाखल केली. याप्रकरणी ११ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आले आहे.

या वेळी न्हावाचे सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाणचे उपसरपंच विजय घरत, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, जयवंत देशमुख, माजी उपसरपंच सागरशेठ ठाकूर, मदन पाटील, निलेश म्हात्रे, सुधीर ठाकूर, सुहास भगत आदी उपस्थित होते.

## आरसीएफ अलिबाग दुर्घटनेतील आणखी एकाचा रुग्णालयात मृत्यू

**अलिबाग : प्रतिनिधी**

आरसीएफ कंपनीच्या अलिबाग–थळ प्रकल्पात झालेल्या स्फोटातील मृतांची संख्या चारवर पोहचली आहे. दुर्घटनेतील जखमी साजिद सिद्दीकी याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. दरम्यान कंपनी व्यवस्थापनाने मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाखांची तर जखमींना तीन लाखांची तातडीची मदत व उपचार खर्च देण्याचा निर्णय घेतला आहे.

कंपनीच्या बाष्पनिर्मिती संयत्र नियंत्रण कक्षात वातानुकूलन यंत्रणा बसविण्याचे काम सुरू होते. बुधवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास अचानक स्फोट झाला. या दुर्घटनेत तिघांचा जागीच मृत्यू झाला होता, तर तीन जण गंभीर जखमी झाले होते. या तिघांना नवी मुंबईतील फोर्टीस रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. यातील साजिद सिद्दीकी याचा गुरुवारी (दि. २०) उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. अन्य दोन जखमींची प्रकृती स्थिर असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. (पान २ वर...)



# राज्यात ट्रान्सफॉर्मेशन 'मित्र' स्थापन करणार

## प्रादेशिक मित्र संकल्पना प्रत्यक्षात आणणारे महाराष्ट्र पहिले राज्य

**मुंबई : प्रतिनिधी**

नीति आयोगाप्रमाणेच राज्यात महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन मित्र स्थापन करण्याचा निर्णय गुरुवारी (दि. २०) झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते. मित्रला मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळ व दैनंदिन कामकाजासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्य अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळ असेल. नियामक मंडळात उपमुख्यमंत्र्यांसह अध्यक्ष राहतील, तसेच उपाध्यक्षपदी तज्ज्ञ व्यक्तीची नियुक्ती करण्यात येईल.



नीति आयोगाच्या धोरणाशी सुसंगत मात्र राज्याच्या गरजांची दखल घेत खासगी क्षेत्र व अशासकीय संस्थांच्या सहभागाद्वारे राज्याचा जलद आणि सर्वसमावेशक विकास साधणे हा मित्रच्या स्थापनेचा हेतू आहे. मित्र ही राज्याच्या विकासाला धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारी थिंक टँक असेल. मित्र राज्य शासनाचे विविध विभाग, भारत सरकार, नीति आयोग, सिव्हिल सोसायटी, विविध अशासकीय संस्था तसेच खासगी व्यावसायिक संस्था यांच्यात सन २०४७पर्यंत राज्याचे निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने समन्वयाचे काम करेल. कृषी व संलग्न क्षेत्र, आरोग्य व पोषण, शिक्षण, कौशल्य विकास व नावीन्यता, नागरीकरण व बांधकाम क्षेत्र विकास आणि भूमी प्रशासन, वित्त, पर्यटन आणि क्रीडा, ऊर्जा संक्रमण आणि वातावरणीय बदल, उद्योग आणि लघू उद्योग, पायाभूत सुविधा, माहिती तंत्रज्ञान, पूरक सेवा व दळणवळण या पारंपरिक क्षेत्रावर मित्रद्वारे लक्ष केंद्रीत करण्यात येईल. त्याचबरोबर या क्षेत्रांच्या प्रभावी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी पूरक असणारे नावीन्यपूर्ण क्षेत्र ड्रोन टेक्नॉलॉजी, कृत्रिम बुद्धिमत्ता व मशिन लर्निंग, सायबर सुरक्षा यांचादेखील समावेश करण्यात येणार आहे. मित्रद्वारे पर्यावरण, वातावरणीय बदल, वने आणि वन्यजीव संरक्षण या क्षेत्रांवरदेखील लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे.

विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्राकरिता पुनर्गठित करण्यात आलेले वैधानिक विकास मंडळ मित्रसाठी प्रादेशिक मित्र म्हणून काम करतील. राज्याच्या विकासात प्रादेशिक समानता आणण्याच्या दृष्टीने प्रादेशिक मित्र महत्वाची भूमिका पार पाडतील. त्या त्या प्रदेशातील अडचणी किंवा समस्या समजून घेऊन मित्राच्या माध्यमातून राज्य पातळीवर सुयोग्य उपाययोजना तयार करण्यात येणार आहेत.

## मोदी सरकार करणार १० लाख रिक्त जागांसाठी महाभरती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी (दि. २२) सकाळी ११ वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे रोजगार मेळाव्याचे उद्घाटन करणार आहेत. या मेळाव्यात १० लाख लोकांना रोजगार मिळणार आहे. मेळाव्यादरम्यान नव्याने भरती झालेल्या ७५ हजार लोकांना नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे.

युवकांना रोजगार पुरवण्यासाठी पंतप्रधानांनी दिलेले वचन पूर्ण करण्यासंदर्भात हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे देशातील नागरिकांच्या विकासामध्ये हातभार लागणार आहे, असे निवेदन या मेळाव्यासंदर्भात पंतप्रधान कार्यालयाने प्रसिद्ध केले आहे. या मेळाव्यांतर्गत पंतप्रधानांच्या निर्देशांनुसार सर्व मंत्र्यांच्या खात्यातील मंजूर रिक्त जागा भरण्यात येणार आहे.

या मेळाव्यातून निवडले गेलेले कर्मचारी सरकारच्या ३८ खात्यांमधील कार्यालयात नियुक्त केले जातील. या नियुक्तीसाठी 'ग्रुप ए' (राजपत्रित), 'ग्रुप बी' (अराजपत्रित) आणि 'ग्रुप सी' असे वर्गीकरण करण्यात आले आहे.

केंद्रीय सशस्त्र दलाचे जवान, सब इंस्पेक्टर, कॉन्स्टेबल, एलडीसी, स्टेनो, पीए, आयकर निरीक्षक या पदांची भरती या मेळाव्यातून करण्यात येणार आहे. या नियुक्त्या मंत्रालयांकडून किंवा यूपीएससी, एसएससी आणि रेल्वे बोर्डाकडून करण्यात येतील. दरम्यान, 'ग्रुप ए' मध्ये (राजपत्रित) २३ हजार ५८४, 'ग्रुप बी'मध्ये (राजपत्रित) २६ हजार २८२, 'ग्रुप बी' (अराजपत्रित) मध्ये ९२ हजार ५२५ तर 'ग्रुप सी'मध्ये तब्बल आठ लाख ३६ हजार रिक्त जागा आहेत. यातील एकट्या संरक्षण मंत्रालयात ३९ हजार ३६६ जागा रिक्त आहेत. रेल्वे मंत्रालयात दोन लाख ९१ हजार कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येणार आहे.

# भटके विमुक्तांच्या समस्या सोडविण्यासाठी पाठपुरावा करणार

## भाजप राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश प्रदेश कार्यकारिणी बैठकीत आश्वासन

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप भटके विमुक्त आघाडीची प्रदेश कार्यकारिणी बैठक मुंबई प्रदेश कार्यलयात झाली. या वेळी राज्यातून आलेल्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले, तसेच संघटनात्मक आढावाही घेण्यात आला.



विमुक्त भटका समाज हा राष्ट्रभक्त असून या समाजाचे प्रश्न सोडवण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र व देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठपुरावा करण्यासाठी मी स्वतः तुमच्याबरोबर येईन, असे आश्वासन भाजपचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश यांनी बोलताना व्यक्त केले. भटके विमुक्त समाजाच्या वर्षाला १० विद्यार्थी व १० हजार शिष्यवृत्ती देण्यात येईल, ३६ जिल्ह्यात वसतिगृह व्यवस्था, तसेच ५० विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणाकरिता शिष्यवृत्ती देण्यात येईल. सरकार तांडावस्ती सुधार योजनेसाठी २०० कोटींची तरतूद करण्यासाठी प्रयत्नशिल आहे, तसेच भटक्या विमुक्त समाजाच्या जातीच्या दाखल्या संदर्भातच्या अडचणी दूर करण्याचे आश्वासन ओबीसी कल्याणमंत्री अतुल सावे यांनी सांगितले, तसेच प्रदेश सरचिटणीस संजय केनेकर यांनी, संघटनात्मक आढावा घेत भटक्या विमुक्त समाजाच्या प्रश्नांवर कार्यकर्त्यांनी काम करण्याचे आवाहन केले. धन्यवाद मोदीजी उपक्रमात सहभागी होत लाभार्थ्यांमार्फत जास्तीत जास्त पत्र पाठविण्याचेही आवाहन केले.

राष्ट्र प्रथम या भाजपाच्या व्हिजनला ध्यानात ठेऊन प्रत्येक कार्यकर्त्याने देशासाठी काम करावे, भाजपाच भटक्या विमुक्त समाजाला न्याय देऊ शकतो. माझ्यासारख्या कार्यकर्त्याला कैकाडी समाजाचा पहिला आमदार भाजपने केला आहे, येणाऱ्या काळात केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना अंत्योदय घटकांपर्यंत पोहचवा, असे आवाहन केले.

या वेळी आमदार गोपीचंद पडळकर, प्रदेश प्रवक्ते गणेश हाके, प्रदेश सहसंयोजक अशोक चोरमले, गोविंदा गुंजाळकर, राजुभाऊ साळुंके, शिवाजी आव्हाड, देविदास राठोड, महिला मोर्चा संयोजिक उज्वला हाके, युवा मोर्चा संयोजक अमोल गायकवाड, मुंबई अध्यक्ष आनंद कुऱ्हाडे आदी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## वाहतूक पोलिसांना आपत्कालीन वैद्यकीय मदतीचे मार्गदर्शन

**नवी मुंबई : बातमीदार**

अपघात घडल्यानंतर आपत्कालीन स्थितीमध्ये वैद्यकीय मदत मिळणे आणि वेळेत ही मदत कशी देता येईल याबाबत नवी मुंबईतील मेडिकव्हर रुग्णालयाने जागतिक ट्रॉमा दिवसाच्या निमित्ताने नवी मुंबईतील कळंबोली, खारघर, सीबीडी बेलापूर, नेरुळ आणि वाशी या पाच ठिकाणी मुख्य चौकातील सिग्नलवर सोमवारी (दि. १७) जनजागृतीपर उपक्रमाचे आयोजन केले होते.



वाहतूक शाखेसोबत आयोजित करण्यात आलेल्या या जनजागृतीपर उपक्रमाची सुरुवात खारघर येथील थ्री मंकी पॉईंटपासून करण्यात आली. त्यानंतर कळंबोली, सीबीडी-बेलापूर असे करीत वाशीमध्ये सांगता झाली. या वेळी मेडिकव्हर रुग्णालयातील आपात्कालीन विभागाचे प्रमुख डॉ. अभिजित सांवत, कन्स्लटंट ब्रेन ॲन्ड स्पाईन सर्जन डॉ. हरीश नाईक, कन्स्लटंट ट्रॉमा अन्ड बालकांच्या अस्थिरोगावरील सर्जन डॉ. नितिश अरोरा, कन्सलटंट आर्थोस्क्रोपिक सर्जन डॉ. शरीफ दुडकेला, जनरल अण्ड लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ. संग्राम करंदीकर आणि कन्सलटंट स्पाईन सर्जन डॉ. बुऱ्हान सलीम या टीमने मार्गदर्शन केले.

# सिडकोच्या व्यवसाय सुलभता कक्षाचे उद्घाटन

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या व्यवसाय सुलभता कक्षाचे उद्घाटन गुरुवारी (दि. २०) सिडको उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजय मुखर्जी यांच्या हस्ते सिडको भवन येथे करण्यात आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवसाय सुलभता कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

आपल्या बहुतांश सेवा ऑनलाइन उपलब्ध करून दिल्यानंतर, ई-प्रशासनाच्या दिशेने सिडकोने टाकलेले हे आणखी एक क्रांतिकारी पाऊल आहे. या वेळी सहव्यवस्थापकीय संचालक अश्विन मुद्गल, डॉ. कैलास शिंदे, विभागप्रमुख मुख्य दक्षता अधिकारी शशिकांत महावरकर एमसीएचआयचे अध्यक्ष मधु पाटील आणि कर्मचारी उपस्थित होते.



सिडकोने ई-प्रशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मालमत्ता हस्तांतरण, बांधकाम परवाना, वसाहत सेवा इ. सेवा यापूर्वीच ऑनलाइन माध्यमाद्वारे उपलब्ध करून दिल्या आहेत. या सर्व सेवा एकाच ठिकाणी 'एक खिडकी निपटारा' पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी सिडकोतर्फे व्यवसाय सुलभता पोर्टलची निर्मिती करण्यात आली आहे.

सध्या व्यवसाय सुलभता पोर्टल अंतर्गत वसाहत सेवा, बांधकाम परवाना सेवा, अभियांत्रिकी सेवा, सर्वसाधारण सेवा आणि नैना प्रकल्पा संदर्भातील सेवा उपलब्ध आहेत, तसेच हे पोर्टल नागरिकांना त्यांनी केलेल्या अर्जाची स्थिती आणि संबंधित विभागाकडून सेवा मिळण्यासाठी लागणारा कालावधीही जाणून घेता येणार आहे. विविध भाषांमध्ये उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या क्यूआर कोडद्वारे व्यवसाय वापरकर्त्यांना आवश्यक ती कागदपत्रे आणि निपटाऱ्यासाठी लागणारा आवश्यक वेळ याबाबतची माहितीही पोर्टलद्वारे मिळू शकणार आहे. नागरिकांना www.cidcoindia.com/eodb पोर्टलची माहिती करून देण्याच्या उद्देशाने सिडको भवनमध्ये नागरीक सुविधा केंद्रही स्थापन करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

**दि बारामती सहकारी बँक लि., पनवेल**

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील नमूद केलेल्या कर्जदारानी दि बारामती सहकारी बँकेकडून सोनेतारण कर्ज घेतले आहे. बँकेने त्यांना दिलेल्या कर्जाची मुदत संपली असून दिलेल्या मुदतीत नमूद केलेल्या कर्जदारांनी आपली कर्ज रक्कम (मुद्दल + व्याज) बँकेकडे परत फेड केलेली नाही. वारंवार संपर्क करून तसेच लेखी पत्र पाठवून देखील आपल्या कर्ज रक्कमेची परतफेड करण्यास सदर कर्जदारानी कसूर केल्याने बँकेने कर्जासाठी तारण ठेवलेले सोन्याचे दागिने विकून सर्व कर्ज रक्कमेची वसूली करण्याचे ठरविले आहे .

तरीही ही नोटीस जाहीर झालेल्या दिनांकापासून आठ दिवसांचे आत संबंधित कर्जदारांनी बँकेकडे संपर्क न साधल्यास बैंकेच्या ताब्यात असलेल्या सोन्याची विक्री करून सदर कर्जाची व्याजासह परतफेड करून घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | नाव | येणे रक्कम रू. | शाखा |
|---|---|---|---|
| १ | श्री. महादेव धर्मा केणी | १,४८,२५८/- | पनवेल |

दिनांक : २०/१०/२०२२
ठिकाण : पनवेल

शिक्का

**सही/-**
**शाखाधिकारी तथा वसुली अधिकारी,**
**दि बारामती सहकारी बँक लि.**
**शाखा - पनवेल**


**पान १ वरून**

### सॅटेलाईटद्वारे होणार नुकसानीचे पंचनामे

शेतकऱ्यांसाठी मोठी घोषणा करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, शेतीच्या नुकसानभरपाईची योजना सॅटेलाईट बेस होणार आहे. ज्यामुळे शेतीत नुकसान झाल्यावर कोणालाही पंचनामा करावा लागणार नाही. उपग्रहाच्या माध्यमातून थेट घटनास्थळाची माहिती मिळेल आणि त्यानंतर ऑटो पायलट मोडवर मदत दिली जाईल. लवकरच अशा प्रकारची सिस्टीम उभारली जाणार आहे.

दीड महिन्यात सात हजार कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदत पोहोचली असल्याचे फडणवीसांनी सांगितले, तसेच सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे आश्वासनही त्यांनी या वेळी दिले.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वृक्षदत्तक योजनेचा शुभारंभ

हे रोप आपल्या घराजवळ लावून पालकांसोबत सेल्फी काढून झाडाच्या वाढीबाबत महाविद्यालयाला व्हॉट्सॲपवर कळवायचे आहे, तसेच या झाडांना क्यूआर कोड देऊन त्या संदर्भातील माहिती संकलित करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने ६०० विद्यार्थ्यांना केशर आंबा रोपांचे वाटप केलेले आहे.

या कार्यक्रमासाठी वनविभागाचे वनाधिकारी निकम यांनीदेखील १५० काजूची रोपे महाविद्यालयास स्वतःच्या खर्चातून दिलेली आहेत. महाविद्यालयाने महाविद्यालय परिसरात व विद्यार्थ्यांच्या घरात वृक्षसंवर्धनाची चळवळ जावी या उद्देशाने हा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. या उपक्रमाचे लोकनेते रामशेठ ठाकूर, ॲड. भगीरथ शिंदे यांनी कौतुक करून या योजनेला शुभेच्छा दिल्या आहेत.

### दातार कंपनीला १ नोव्हेंबरपर्यंतचा अल्टिमेटम

त्यामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आले, मात्र कंपनी प्रशासनाला अल्टिमेटम देत कामगारांचा प्रश्न १ नोव्हेंबरपर्यंत न सोडवल्यास भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

या आंदोलानामध्ये भाजपचे पनवेल तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, जनरल कामगार संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत, पंचायत समितीच्या माजी सदस्या तथा महिला मोर्चा तालुका अध्यक्षा रत्नप्रभा घरत, पंचायत सिमतीचे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, महापालिकेच्या माजी उपमहापौर चारुशीला घरत, कसळखंचे माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, रवींद्र कोरडे, योगेश लहाने, ॲड. संजय टेंभे, कसळखंडच्या सरपंच माधुरी पाटील, शिवाजी माळी, पोयंजे विभागीय अध्यक्ष प्रवीण ठाकूर, पोयंजे युवा मोर्चा अध्यक्ष गणेश आगिवले, उपाध्यक्ष राजेश लबडे, गुळसुंदे विभागीय अध्यक्ष सुनिल माळी, प्रतिक भोईर, वावेघर माजी सरपंच राजेश माळी, कविता घरत, माई गायकर, दत्ता गायकर, ताणाजी पाटील, संतोष पाटील, जयेश मते, रोहिदार जुंगारे, प्रवीण पाटील, योगेश गायकर, प्रशांत पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

### शेकाप आमदार जयंत पाटील जेलमध्ये जाणार

सुमारे ४२५ कोटी रुपये परदेशात पाठवले आहेत. ते कुणाच्या नावाने पाठवले आहेत, कसे पाठवले आहेत, याचे पुरावे माझ्याकडे आहेत. त्यामुळे लवकरच आमदार जयंत पाटील जेलमध्ये असतील, असे आमदार महेंद्र दळवी म्हणाले.

आमदार जयंत पाटलांची राजकीय घटिका भरत आली आहे. जयंत पाटील यांनी आतापर्यंत अनेकांना देशोधडीला लावले आहे. आतापर्यंत त्यांनी जेवढे अन्याय केले आहेत, त्या सर्वांचा हिशेब चुकता करणार. इतरांना देशोधडीला लावणाऱ्या जयंत पाटलांना मी रस्त्यावर आणणार, असा इशारा अमदार महेंद्र दळवी यांनी दिला. वेश्वी ग्रमापंचायत ही आमदार जयंत पाटील यांचे निवासस्थान असलेली ग्रामपंचायत आहे. तिच आम्ही जिंकली आहे. शेतकरी भवनमध्ये बसून महाराष्ट्राला शहाणपण शिकवणाऱ्यांना ग्रामपंचायत निवडणुकीतील पराभवामुळे घरात गोधडी घेऊन झोपण्याची वेळ आली आहे, अशी टिका आमदार महेंद्र दळवी यांनी केली.

या वेळी मानसी दळवी, आदिती दळवी, माजी सरपंच नारायण वार्डे, बाळासाहेबांची शिवसेना जिल्हाप्रमुख राजा केणी आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### आरसीएफ अलिबाग दुर्घटनेतील आणखी एकाचा मृत्यू

या संपूर्ण दुर्घटनेच्या कारणांचा शोध घेण्यासाठी उच्चस्तरीय तज्ज्ञ सदस्यांची चौकशी समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, फॅक्ट्री इन्पेक्टर, महाराष्ट्र प्रदूषण नियामक मंडळाच्या सदस्यांनी दुर्घटनास्थळाची पाहणी केली आहे. दुर्घटनेनंतर कंपनीतील सर्व संयत्रांचे प्रचलन सुस्थितीत सुरू आहे, अशी माहिती कंपनीचे मुख्य महाव्यवस्थापक श्रीनिवास कुलकर्णी यांनी दिली आहे.


विश्वसनीय दैनिक राम प्रहर



**महाराष्ट्र शासन**

**महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)**

**Email :- mahad.ee@mahapwd.com** **Ph. No. 02145 222167**

**ऑनलाईन निविदा सूचना क्रमांक ४७ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन-४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५-२२२१६७ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडुन खालील प्रमाणे **(बी-१)** नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड (सा.बां.) विभाग, महाड, जिल्हा रायगड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | भाग अ (स्थापत्य कामाची किंमत) | इसारा/ बयाणा रक्कम | ई-निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्रीवर्धन येथे नवीन न्यायालयीन इमारत बांधण्याबाबत. तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड (४०५९ न्यायालय) | ११०१३२९१७ | १०८८३८८१५ | ५५५००० | ३५८० | २४ महिने |

**ई-निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक २८/१०/२०२२ (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक २२/११/२०२२ वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | निविदापुर्व बैठक | मा. मुख्य अभियंता, (सा. बां.) प्रादेशिक विभाग, कोकण, फोर्ट मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १५/११/२०२२ वेळ १५.०० वाजता |
| ३ | ऑनलाईनव्दारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | अधीक्षक अभियंता, रायगड सा. बा. मंडळ, कोकणभवन, नवीमुंबई यांचे कार्यालयात दिनांक २५/११/२०२२ वेळ १२.०० वाजता |

**टिप:-** परिपुर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईल निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुध्दिपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शती व अटी या वरील संकेत स्थळांवरच पहाता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/४५०५**
**दिनांक : २०/१०/२०२२**

**सही/-**
**(एम. आर. नामदे)**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

## जेएनपीटीकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांची अनधिकृत पार्किंग

# महामार्गावरील सर्व्हिस रोड खुला करण्याची मागणी



**उरण : बातमीदार**

जेएनपीटी ते पळस्पे तसेच जेएनपीटी ते आम्रमार्ग या महामार्गावरील सर्व्हिस रोड स्थानिक, नागरिकांना वाहतुकीसाठी मोकळा करून न दिल्याने तसेच बेकायदेशीर पार्किंगमुळे अनेकांचे अपघातात बळी गेले आहेत. त्यामुळे जेएनपीटी ते पळस्पे तसेच जेएनपीटी ते आम्रमार्ग या महामार्गावरीत सर्व्हिस रोड स्थानिक, नागरिकांना वाहतुकीसाठी मोकळा करून द्यावे, अशी मागणी पत्रव्यवहाराद्वारे बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाचे रायगड उपजिल्हाप्रमुख अतुल भगत यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे केली आहे.

रायगडमधील उरण तालुक्यातील जेएनपीटी (जेएनपीए) बंदरातील येणाऱ्या-जाणाऱ्या कंटेनर्सची वाहतूक वेगवान तसेच सुकर होण्यासाठी जेएनपीटीने सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्च करून महामार्ग तयार केला आहे. तसेच उरणहून पनवेल, नवी मुंबई, ठाणे, पुणे येथे जाण्या-येण्यासाठी महामार्गाला समांतर असा सर्व्हिस रोडसुद्धा तयार केला आहे. सध्या या दोन्ही महामार्गालगत असलेले सर्व्हिस रोडवर अनधिकृत पार्किंगमुळे २४ तास वाहने उभी असतात. या सर्व्हिस रोडच्या बाजूने अनेक अनधिकृत कंटेनर्स यार्ड्स आहेत व त्याची वाहतूक सुद्धा याच सर्व्हिस रोडमधून होत आहे. त्यांची बाहेरून आलेली वाहनेसुद्धा याच सर्व्हिस रोडवर उभी केली जातात. परिणामी स्थानिक नागरिकांना तसेच मोटरसायकल, रिक्षाने प्रवास करणाऱ्यांना मुख्य महामार्गावरून प्रवास करावा लागतो त्यामुळे अनेक अपघात होऊन अनेकांना आपले प्राण गमवावे लागले आहे. या अनधिकृत कंटेनर्स यार्डमुळे अपघात तसेच वाहतूक कोंडी होत असताना या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही.

या संदर्भात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण तसेच जेएनपीटी प्रशासनाशी अतुल भगत यांनी अनेक वेळा पत्रव्यवहार केला आहे. तसेच अनेक बैठकासुद्धा घेतल्या आहेत.

**...अन्यथा तीव्र आंदोलन करू -अतुल भगत**

महामार्ग लगत व महामार्गावर उभे असलेल्या अनिधिकृत वाहणावर, बेकायदेशीर पार्किंग वर त्वरित योग्य ती कारवाई करावी अन्यथा राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विरोधात उग्र आंदोलन उभारले जाईल, असा आक्रमक इशारा बाळासाहेबांची शिवसेना या पक्षाचे रायगड उपजिल्हाप्रमुख अतुल भगत यांनी प्रशासनाला दिला आहे.

> **सर्व्हिस रोडवर होणाऱ्या अनधिकृत पार्किंगवर कारवाई करूनहा सर्व्हिस रोड वाहतूकीसाठी लवकरच खुला करण्यात येईल.**
>
> -प्रशांत फेगडे, व्यवस्थापक, विभाग जेएनपीटी, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण

# पनवेल मनपातर्फे बचत गटांच्या महिलांसाठी जनजागृती कार्यक्रम



**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिका क्षेत्रात 'स्वच्छ भारत'सर्वेक्षण १६ ते २२ ऑक्टोबर या दरम्यान राबविण्यात येत आहे. त्यानुसार माझी वसुंधरा अभियानांतर्गत कचरा विलगीकरणाचे महत्त्व नागरिकांना पटवून देण्याकरिता 'स्वच्छता का उपहार' हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. 'स्वच्छता के दो रंग हरा गिला, सुखा निला' या उपक्रमाची बचत गटाच्या महिलांमध्ये जनजागृती करण्याच्या दृष्टीने बुधवारी (दि. १९) आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात कार्यक्रम घेण्यात आला.

या वेळी उपायुक्त कैलास गावडे, सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते, एनयुएलम विभाग प्रमुख विनया म्हात्रे, उपायुक्त सचिन पवार, प्रभाग अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि महापालिका क्षेत्रातील बचत गटांचे सुमारे २०० हून अधिक महिला उपस्थित होते.

उपायुक्त कैलास गावडे यांनी प्लास्टिकला पर्याय म्हणून कापडी पिशव्या आपण शिवू शकतो. बचत गटांच्या महिलांनी याकडे व्यवसायाची संधी म्हणून पहावे, असे आवाहन केले. सचिन पवार यांनी ओला व सुका कचऱ्याच्या वर्गीकरणाविषयी जनजागृती करणे, कापडी पिशव्या तयार करणे अशा पर्यावरणाविषयी संबधित कामांमध्ये महापालिकेस सहकार्य करण्यास सांगितले.

सहाय्यक आयुक्त डॉ. वैभव विधाते यांनी बचतगटाच्या महिलांना ओला व सुका कचरा वर्गीकरणाविषयी माहिती दिली. तसेच कंपोस्ट खत कसे तयार करावे याबाबत एक माहितीपट दाखविला. यासोबतच प्लास्टिक दुष्परिणामाची माहिती त्यांनी दिली, प्लास्टीकच्या दुष्परिणामावरील शॉर्ट फिल्म दाखवण्यात आली.



**खारघर : शिक्षक दिनानिमित्त स्काय बुक आयोजित ऑनलाइन ॲक्टिव्हिटी बेस्ड लेसन प्लॅन रायटिंग स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या पाच टीचर्सने सहभाग घेतला होता. यामध्ये अस्मा चौगुले यांना त्यांच्या ॲक्टिव्हिटी बेस्ड लेसन प्लॅन रायटिंगसाठी स्काय बूकतर्फे उत्कृष्ट लेखन पुरस्कार म्हणून प्रमाणपत्र व स्मृती चिन्ह प्रदान करण्यात आले. याबद्दल त्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी अभिनंदन केले.**


# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाची शैक्षणिक सहल

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाची बुधवारी (दि. १९) नॅशनल स्टॉक एक्सचेंज येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली होती. बारावी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी या शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले होते.

नॅशनल स्टॉक एक्सचेंज ज्याला आपण मराठीत 'राष्ट्रीय रोखे बाजार' (एनएसई) असे म्हणतो. एनएसई हे भारत देशातील मुंबई शहरात आहे. १९९२साली स्थापन झालेल्या एनएसईवर सध्या १६९६ कंपन्या रोखे व समभागाची खरेदी विक्री करतात. एनएसईमध्ये वापरल्या जाणाऱ्या निर्देशांकाचे सीएनएक्स निफ्टी असे नाव आहे. निफ्टी हा मुंबई रोखे बाजाराच्या सेन्सेक्ससोबत भारतामधील सर्वात महत्त्वाचा निर्देशांक समजला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेची नाडी मानला जातो. एकूण ६३ विद्यार्थ्यांनी या शैक्षणिक सहलीचा लाभ घेतला. यात मुलांना इकोनॉमिक ट्रिक्स सांगितले. त्याचबरोबर कॅपिटल मार्केट, ट्रेडिंग, गुंतवणुक कसे करायला पाहिजे याबद्दल मुलांना माहिती मिळाली. या शैक्षणिक सहलीचे नियोजन डॉ. सुहास स, सौ. स्वप्ना यांनी केले. या शैक्षणिक सहलीसाठी प्राचार्या निशा नायर यांचे मार्गदर्शन भेटले.





# साप्ताहिक रायगडच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन





**पनवेल : वार्ताहर**

पनवेल मधून सातत्याने प्रसिद्ध होणारे साप्ताहिक रायगड पनवेल हा दिवाळी अंक यंदाही सर्व माहिती पूर्ण आहे वाचनीय आहे. वेगवेगळ्या प्रकारच्या माहिती यात असल्याने निश्चितच संतोष भगत यांचा हा अंक सुद्धा परिपूर्ण नटलेला असल्याचे प्रतिपादन पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांनी या अंकाच्या प्रकाशनावेळी केले.

या वेळी साप्ताहिक रायगड पनवेलचे संपादक संतोष भगत, पोलीस कर्मचारी माधव शेवाळे, पत्रकार संजय कदम, दीपक महाडिक, अनिल भोळे, अनिल कुरघोडे, रवींद्र गायकवाड, असीम शेख या पत्रकार बांधवांसह मनसेचे पराग बालड आदी उपस्थित होते.

दरम्यान, पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी या दिवाळी अंकाला शुभेच्छा दिल्या. या वेळी उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त कैलास गावडे, कार्यकारी अभियंता संजय काटेकर, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# दिवाळी अंक 'कहकशा'चे प्रकाशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पत्रकार वसिम पटेल यांच्या दिवाळी अंक 'कहकशा'चे प्रकाशन पनवेल एजुकेशन सोसायटीचे अध्यक्ष व पनवेलमधील प्रसिद्ध उद्योजक इक्बाल काझी यांच्या हस्ते झाले.

या वेळी इक्बाल काझी यांना उर्दूमित्र पुरस्कार मिळाल्याने त्यांचा सत्कार पत्रकार वसिम पटेल यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच इक्बाल नावडेकर यांची रायगड मुस्लीम फलाही तंझीमच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याने त्यांचा व हमीद धुरू यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचाही सत्कार अब्दुल रेहमान ठाणगे यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी पनवेल अनेक मान्यवर उपस्थित होते.



(छाया : चेतन पोपटा)

# मोठीजुई शाळेत महिला स्वयंसहाय्यता गटांनी भरविले विविध प्रकारचे स्टॉल्स

**उरण : बातमीदार**

उरण तालुका पंचायत समिती एनआरएलएम विभाग अंतर्गत ग्रामपंचायत मोठी जुईच्या वतीने रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मोठी जुई येथे गावातील विविध स्वयंसहाय्यता महिला बचत गटाचे दिवाळी निमित्ताने विविध प्रकारच्या खाद्यपदार्थ व वस्तूंचे प्रदर्शन भरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन उरणचे सांख्यिकी विस्तार अधिकारी सुरेंद्र पालव यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाला उपस्थित एनआरएलएम टीमचे मदने सर, आरोग्य सहायक अजय पाटील, मोठीजुई शाळेचे मुख्याध्यापक संजय होळकर, सरपंच अश्विनी लहू पाटील, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष तृप्ती बंडा, माजी सरपंच आशा भोईर, सीआरपी करुणा ताई आणि काजल ताई तसेच ग्रामपंचायत व एसएमसी सदस्य, शाळेतील सर्व शिक्षक वृंद, विद्यार्थी वर्ग व ग्रामपंचायतमधील सर्व स्वयं सहायता समूह उपस्थित होते.

या वेळी बऱ्याच प्रकारच्या खाद्य पदार्थ, दिवाळी उपयुक्त साहित्य व फराळ साहित्य, कपडे, मिठाईचे स्टॉल, मच्छीफ्राय भाकरी इ.स्टॉल्स लावण्यात आले होते. शालेय विद्यार्थी व ग्रामस्थांनी या उपक्रमाला चांगला प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक संजय होळकर तर निवेदन व आभार दर्शन पाटील यांनी केले.



# नितीन पाटील यांच्या माध्यमातून दिवाळीनिमित्त 'भव्य किल्ले' स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जाणीव एक सामाजिक संस्था पनवेलचे संस्थापक अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या माध्यमातून प्रभाग क्र.१८ अंतर्गत दिवाळीनिमित्त 'भव्य किल्ले' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या संकल्पनेतून यावर्षी एक स्तुत्य उपक्रम राबविण्यात येत आहे.

सर्व तरुणांना छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास जवळुन अनुभवता यावा यासाठी किल्ले स्पर्धेत सहभागी प्रत्येक मावळ्यास मोफत 'रायगड दर्शन' घडवण्यात येणार आहे. त्यामुळे या स्पर्धेत मोठ्या संख्येने तरुणांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

जाणीव एक सामाजिक संस्था आयोजित प्रभाग क्र.१८ अंतर्गत भव्य किल्ले स्पर्धेत विजेत्या प्रथम तीन क्रमांकांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार आहेत तर प्रत्येक सहभागी मावळ्यास सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल. सहभाग नोंदवण्यासाठी २४ ऑक्टोबर पर्यंत मुदत ठेवण्यात आली असून २५ ते २८ ऑक्टोबर पर्यंत तज्ञ परीक्षकांच्या माध्यमातून किल्ले परीक्षण केले जाणार आहे. अधिक माहितीसाठी प्रसाद कंधारे (८४५१८४२९१९) व महेश सरदेसाई (९३२३२६६१६३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# भाताणमधून महिला बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील भाताण गाव येथील एक २६ वर्षीय महिला रागाने कोणास काही एक न सांगता कोठे तरी निघून गेल्याने ती हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

लीला भिबुती बुया (वय २६, रा. साई आळी, भाताण) असे त्या महिलेचे नाव असून रंग सावळा, उंची पाच फूट, केस लांब काळे, चेहरा गोल, अंगाने मध्यम, कानात सोन्याची बाली, गळ्यात लाल धाग्यात साई बाबांचा फोटो असून तिच्या अंगात लाल साडी व गोल्डन ब्लाउज, पायात सॅन्डल आहे. तिला हिंदी व ओडिसा भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल तालुका पोलीस ठाणे (०२२-२७४५२४४४) किंवा पोलीस हवालदार धनाजी तांडेल यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उरण महाविद्यालयातर्फे स्वच्छता अभियान



**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली.

उरण येथील शासकीय धान्य कोठार परिसरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी पॉलिथिन, कॅरीबॅग व इतर घनकचरा गोळा केला व परिसराची स्वच्छता केली व जमा झालेल्या कचऱ्याची नगरपालिका सफाई कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून व्यवस्था करण्यात आली.

स्वच्छता ही सेवा डोळ्यासमोर ठेवून हा उपक्रम हाती घेण्यात आला महाविद्याचे प्राचार्य प्राध्यापक बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या उपक्रमात प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण प्रा. मेघा रेडडी, एनएसएस प्रमुख डॉ. दत्ता हिंगमिरे व मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

संपादकीय

# निवडणुका लांबणीवर

शिंदे–फडणवीस सरकारने सत्तेची सूत्रे घेताक्षणी तातडीने दोन निर्णय घेतले. पहिला म्हणजे नगराध्यक्षांची निवडणूक थेट जनतेतून करण्याचा निर्णय पूर्ववत केला. त्याचबरोबर मुंबई महापालिकेची प्रभागरचनादेखील पूर्वीप्रमाणेच कायम ठेवली. या निर्णयांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले, मात्र यात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने आता स्पष्ट नकार दिल्याने 'शिवसेना–उद्धव बाळासाहेब ठाकरे' पक्षाची चांगलीच पंचाईत झाली आहे. याचिकाकर्त्यांनी आधी उच्च न्यायालयात जावे व तेथेच आपले म्हणणे मांडावे असे आदेश आता सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

**महाराष्ट्रात सत्तांतर घडून आले तेव्हा खरे तर विधानसभा, आमदारकी, मंत्रीपदे असले कुठलेही मुद्दे चर्चेतदेखील नव्हते. साऱ्याच पक्षांच्या नजरा महापालिका निवडणुकीवर केंद्रित झाल्या होत्या. कोरोना काळातच महाराष्ट्रातील महापालिकांवर तसेच नगरपालिकांवर प्रशासक आले. लोकांनी निवडून दिलेले नगरसेवक पुढील निवडणुकांची तारीख कधी लागते याची वाट बघत बसले. यथावकाश कोरोनाचा जोर संपला आणि निवडणुकांची चाहुल लागली. मधल्या काळात विधानपरिषदेच्या आणि राज्यसभेच्या निवडणुका पार पडल्या, परंतु त्यात जनतेचा थेट सहभाग नव्हता. या दोन्ही निवडणुकींमध्ये भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांचे बुद्धिचातुर्य उठून दिसले. त्यांच्या डावपेचांनी महाविकास आघाडी सत्तेवर असूनही खिळखिळी झाली. नंतर अल्पावधीतच शिवसेनेत अभूतपूर्व फूट पडली आणि कमालीच्या वेगवान आणि नाट्यमय घडामोडींनंतर मुख्यमंत्रीपदी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे विराजमान झाले. हा इतिहास ताजाच आहे. या संपूर्ण घडामोडींमुळे महापालिका निवडणुका मात्र अधांतरीच राहिल्या. कुठल्याही क्षणी मुंबई महापालिका आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तारखा जाहीर होतील या अटकळीने सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले. अर्थात, उभ्या फुटीमुळे जर्जर झालेली शिवसेना सोडून. नुकत्याच होऊन गेलेल्या पंचायत निवडणुकांमध्ये भाजपने सर्वाधिक जागा मिळवत आपले वर्चस्व सिद्ध केले. गेल्या टर्ममध्ये मुख्यमंत्रीपदी असताना नगराध्यक्षांची निवडणूक थेट जनतेतून करण्याचा निर्णय फडणवीस यांनी घेतला होता. नंतर महाविकास आघाडी सरकारने तो बदलला. त्यांच्याच कार्यकाळात मुंबईतील प्रभाग रचनेत सोयीनुसार बदल करण्यात आले. मविआच्या सोयीनुसार प्रभागांची संख्या वाढवून एकूण नगरसेवकांची संख्या २३६च्या घरात गेली. शिंदे–फडणवीस सरकारने सत्तेवर येताच मुंबई महापालिकेची प्रभागरचना पूर्वीप्रमाणेच कायम ठेवण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले, मात्र यात हस्तक्षेप करण्यास सर्वोच्च न्यायालयाने आता स्पष्ट नकार दिला आहे. प्रभागरचनेतील बदलाबाबत कुठलाही हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिल्यामुळे आगामी महापालिका निवडणुका आणखी लांबणीवर पडणार अशी चिन्हे दिसू लागली आहेत. पालिका निवडणुकीसंदर्भात मे महिन्यात झालेल्या सुनावणीत सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने घेण्याची सूचना केली होती, परंतु तेव्हा पावसाळा तोंडावर आल्याचे कारण सांगून निवडणुका घेणे अडचणीचे होऊ शकते असा युक्तिवाद राज्य सरकारने केला होता. ते समजून घेण्याजोगे होते, परंतु आता असंतुष्टांच्या कोर्टबाजीमुळे महापालिका निवडणुका आणखी लांबणीवर पडणार आहेत असे दिसते. या निवडणुका घ्यायच्या असतील तर त्याआधी त्याबाबतचा फैसला उच्च न्यायालयात व्हावा लागेल. राजकीय शक्ती क्षीण झाल्यानंतर कुठल्याही पक्षाला निवडणुकींबाबत उत्साह वाटेनासा होतो. शिवसेनेच्या ठाकरे गटाची ही कोर्टबाजी आणि त्या अनुषंगाने केलेली टाळाटाळ कुणालाही सहज कळेल.**

# अलिबागमध्ये शेकापला अतिआत्मविश्वास नडला

खबरबात
प्रकाश सोनवडेकर

नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत अलिबाग तालुक्यातील वेश्वी आणि नवेदर नवगाव या दोन्ही ग्रामपंचायतीमध्ये शेकापचा पराभव झाला. या दोन्ही ग्रामपंचायतींमध्ये शेकापचे सदस्य जास्त निवडून आले, मात्र थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत शेकापचे उमेदवार पराभूत झाले. शेकापच्या बालेकिल्ल्यात त्यांचा झालेला पराभव सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. शेकाप नेत्यांचा अतिआत्मविश्वास या निवडणुकीत नडला. त्यांनी उमेदवार निवडण्यात केलेली चूक पक्षाच्या पराभवास कारणीभूत ठरली.

वेश्वी ग्रामपंचायतीत गोंधळपाडा गावातून यंदा सरपंच पदाचा उमेदवार दिला जावा अशी मागणी स्थानिक करण्यात आली होती, मात्र शेकाप पक्षनेतृत्वाने त्याकडे दुर्लक्ष केले. पुन्हा एकदा वेश्वीच्या प्रफुल्ल पाटील यांना उमेदवारी जाहीर केली. त्यामुळे गावात दोन गट पडले. पक्षाचा एक गट विरोधकांच्या कंपूत जाऊन मिळाला. आमदार महेंद्र दळवी यांनी ही संधी साधली. त्यांनी स्थानिक विकास आघाडी स्थापन केली. सर्व पक्षांची मोट बांधली. शेकाप विरुद्ध आघाडी तयार केली. ही ग्रामपंचायत जिंकून शेकापला धक्का दिला.

खरेतर सरपंच पदासाठी गोंधळपाडावासीयांची मागणी रास्त होती. कारण आजवर झालेल्या निवडणूकीत वेश्वीमधीलच सरपंच झाला आहे. गोंधळपाड्याला संधी मिळाली नव्हती. गोंधळपाडा गावकीनेदेखील यंदा गोंधळपाड्यातील व्यक्तीलाच सरपंचपदाची संधी द्या अशी विनंती शेकाप नेत्यांकडे केली होती. ती धुडकावल्यामुळे गावात नाराजी पसरली. गोंधळपाड्यातील नाराजी आमदार महेंद्र दळवी यांनी बरोबर हेरली. त्यांनी गोंधळपाड्यातील गणेश गावडे सरपंच पदाची उमेदवारी दिली. इथेच या निवडणुकीला कलाटणी मिळाली. गावकऱ्यांनी स्थानिक अस्मितेचा मुद्दा करून गावडे यांना एक गठ्ठा मतदान केले. वेश्वी गावातील शेकापमधील असंतुष्टांनी त्यात हातभार लावत भर घातली. त्यामुळे शेकापच्या प्रफुल्ल पाटील यांचा पराभव झाला. वेश्वीमध्ये आमदार जयंत पाटील यांचे निवासस्थान आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची होती. या ग्रामपंचायतीमधील पराभव हा शेकाप नेतृत्वाला इशारा आहे.

नवेदर नवगावमध्येही शेकापचा पराभव झाला. स्थानिक आघाडीच्या प्रियांती घातकी यांनी शेकापच्या अंकीता जैतू यांचा सरपंचपदाच्या निवडणूकीत पराभव केला. घातकी सरपंच पदासह दोन प्रभागांतून त्या सदस्य पदाच्या निवडणुकीसाठी उभ्या होत्या तिनही ठिकाणी त्या निवडून आल्या. प्रियांती घातकी शेकापचे कट्टर कार्यकर्ते आणि माजी सरपंच कर्ण कटोर यांच्या कन्या आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर त्यांच्याबद्दल सहानुभूती मिळाली. जवळपास ४५ वर्षे या ग्रामपंचायतीवर शेकापचे वर्चस्व होते. त्यानंतर आरक्षणामुळे गेली १५ वर्षे ग्रामपंचायतीवर प्रशासकराज होते. त्यामुळे या ग्रामपंचायतीवरील शेकापची पकड काहीसी ढिली झाली होती. कार्यकतदेखील नाराज होते. या नाराजीचा फायदा आमदार महेंद्र दळवी यांनी अचूक फायदा उचलला. येथेदेखील त्यांनी शेकाप विरूध्द सर्व पक्षांची आघाडी केली. जर आम्हाला हवा असलेल्या उमेदवार दिला नाही तर आम्ही तुमचे ऐकणार नाही. आमचा निर्णय आम्ही मतपेटीतून दाखवू हा संदेश वेश्वी आणि नवगाव या ग्रामपंचायतींच्या निकालातून जनतेने दिला आहे.

अलिबाग तालुक्यात आघाडीने वेश्वी आणि नवगाव या दोन ग्रामपंचायतींच्या थेट सरपंचपदाच्या निवडणूकीत यश मिळवले असले तरी शेकापचे सदस्य जास्त निवडून आले आहेत. ग्रामपंचायत निवडणूक पक्षाच्या चिन्हावर निवडली जात नाही. तरीदेखील राजकीय पक्षांचे नेते या निवडणूका प्रतिष्ठेच्या बनवतात. या निवडणूकांमध्ये पक्षापेक्षा उमेदवार कोण आहे ते पाहिले जाते. उमेदवाराचे नाते संबंध, शेजार धर्म, मैत्री, त्याचा वैयक्ती संपर्क यावरच ग्रामपंचयात निवडणूकीचा निकाल अवलंबून असतो. शेकाप नेत्यांनी जर स्थानिकांच्या मागणीप्रमाणे सरपंचपदाचे उमेदवार दिले असते तर कदाचित चित्र वेळ असते. शेकाप नेत्यांच्या अतिआत्मविश्वासामुळे अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणुकांमध्ये शेकापचा पराभव झाला आहे. दुसरी बाब म्हणजे एकट्या कुठल्याही पक्षाने हे यश मिळवले नाही. सर्व पक्ष विरूध्द शेकाप अशी लढत झाल्यामुळेच शेकापचे सरपंचपदाचे उमेदवार पराभूत झाले आहेत.

अलिबाग तालुक्यात सर्व पक्ष एकत्र आले तर शेकापचा पराभव होऊ शकतो हे सिध्द झाले आहे. अलिबाग तालुक्यात शेकापला पराभत करण्यासाठी शिवसेना शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेसदेखील, भाजप एकत्र होते.

जिल्हा परिषद निवडणूकीत हे शक्य होईलच असे नाही. प्रत्येकी निवडणूकीचे गणित वेगळी असते. त्यामुळे दोन ग्रामपंचयात निवडणूकांमध्ये यश मिळविल्यामुळे विकास आघाडीने हुरळून जाण्याची गरज नाही. खरी परीक्षा होणार आहे ती आगामी जिल्हा परिषद निवडणूकीत. ग्रामपंचायत निवडणुकीत आघाडीने विजय मिळवला म्हणून जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूकीतदेखील असेच परिणाम दिसतील असे नाही.

# आज भारतीय शहीद पोलीस स्मृती दिन



आज भारतीय शहीद पोलीस स्मृती दिन आहे. दरवर्षी २१ ऑक्टोबर हा दिवस पोलिस स्मृती दिन म्हणून पाळण्यात येणार आहे. या दिवशी शहीद पोलिस जवानांना श्रद्धांजली अर्पण केली जाते. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख येथे चीनच्या सैनिकासोबत लढतांना केंद्रीय राखीव दलाच्या दहा जवानांनी प्राणाची आहुती दिली होती. तेव्हापासून २१ ऑक्टोबर हा पोलिस हुतात्मा दिन म्हणून पाळण्यात येतो. वर्षभरात जे जवान देशात आणि राज्यात शहीद झाले अशा जवानांना या २१ ऑक्टोबर रोजी श्रद्धांजली वाहण्यात येते.

जिल्ह्याच्या मुख्यालयात या निमित्ताने शहीद पोलिसांना अभिवादन केले जाते. तसेच विविध उपक्रमाचे आयोजनही केले जाते. २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाखमधील भारताच्या सीमेवर बर्फाच्छादित व निर्जन ठिकाणी केंद्रीय राखीव पोलीस दलातील १० जवान गस्त घालत होते. या वेळी दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांनी केलेल्या हल्ल्यात दहा जणांना वीरगती प्राप्त झाली होती. या घटनेने देशात दु:खाची लहर पसरली होती. वीर जवानांनी दाखवलेल्या या अतुलनीय शौर्यापासून इतरांना स्फूर्ती मिळावी, तसेच आपल्या कर्तव्याची व राष्ट्रनिष्ठेची जाणीव व्हावी म्हणून शहीद जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २१ ऑक्टोबर हा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. महाराष्ट्र पोलिसांकडून अभिवादन आपले कर्तव्य पार पाडत असताना देशासाठी प्राण गमावलेल्या हुतात्म्यांना पोलीस स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्र पोलीस दलाच्या वतीने आदरांजली. हे राष्ट्र त्यांचे बलिदान कधीच विसरणार नाही, अशा शब्दांत महाराष्ट्र पोलिसांनी अभिवादन केले आहे.

देशाची अखंडता आणि एकात्मतेचे रक्षण करण्यासाठी, कधी नक्षल्यांविरोधात तर कधी समाजविघातक कृत्य करणाऱ्यांविरोधात कारवाई करताना तर कधी कायदा आणि सुव्यवस्थेचे पालन नीट व्हावे म्हणून सतत जागरूकपणे आपली सेवा बजावताना, कर्तव्यात जराही कसूर न करता वीरमरण प्राप्त झालेल्या पोलीस जवानांची आठवण मनात कायम तेवत ठेऊन श्रद्धांजली वाहण्यासाठी देशभरात हा दिवस पोलीस हुतात्मा दिन म्हणूनदेखील साजरा केला जातो.



## बदलते तंत्रज्ञान




# स्वस्तात सामान विकणारे 'हे' सरकारी पोर्टल

भारतात जास्तीत जास्त लोक ऑनलाइन सामान हे फ्लिपकार्ट आणि अमेझॉनवरून ऑर्डर करीत असतात. जर तुम्ही सुद्धा असेच करीत असाल तर तुम्हाला आज या ठिकाणी काही महत्त्वाची माहिती देत आहोत. एक असे सरकारी पोर्टल आहे. या वर कोणतेही सामान स्वस्तात खरेदी करू शकता. हे आम्ही सांगत नाही तर एका सर्वेतून समोर आले आहे, परंतु ऑर्डर करण्याआधी यासंबंधी तुम्ही सविस्तर जाणून घ्या. त्यानंतरच ऑर्डर करा.

Government e Marketplace (GEM) नावाचे एक सरकारी मार्केट प्लेस आहे. जे चांगल्या क्वॉलिटीचे प्रोडक्ट्सला अन्य ई–कॉमर्स साइटवरून कमी किंमतीत विकत आहे. या ठिकाणी तुम्हाला सर्व प्रकारचे सामान मिळते. सोबत या ठिकाणी एक मोठी रेंज मिळते. याचे खास वैशिष्ट्ये म्हणजे सर्व सामानांची किंमत अन्य ई–कॉमर्स साइटच्या तुलनेत कमी असते. यासंबंधी लोकांना अजून फारसी माहिती नाही. आज आम्ही तुम्हाला या ठिकाणी यासंबंधीची माहिती देत आहोत.

२०२१ ते २२२ मध्ये एक Economic Survey करण्यात आला होता. यातून ही माहिती समोर आली आहे. या ठिकाणी जवळपास १० प्रोडक्ट्सची लिस्ट बनवली होती. यातून हे समोर आले की, या ठिकाणी मिळणाऱ्या सर्व वस्तू या खूपच कमी किंमतीत मिळत आहेत. कमी किंमतीत मिळत असल्याने अनेकांना वाटले की, सामान नकली असतील परंतु, असे काही नाही.

१० प्रोडक्ट्स असे समोर आले आहे की, याची किंमत अन्य ई–कॉमर्स साइटच्या तुलनेत ९.५ टक्के कमी होती. जर ग्राहक या ठिकाणाहून सामान खरेदी करीत असतील तर याचा फायदा मिळू शकतो.

त्यामुळे तुम्हाला चिंता करण्याची गरज नाही. जर तुम्हाला या ठिकाणाहून ऑर्डर करायचे असेल तर या ठिकाणी ऑनलाइन ऑप्शन सुद्धा उपलब्ध आहे. सरकारी ई–कॉमर्स साइट असल्याने अनेकांना याची फारसी माहिती उपलब्ध नाही.

# बॉलीवूडचा देखणा राजकुमार शम्मी कपूर



शम्मी कपूर हे हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेते होते. इ.स. १९५० आणि इ.स. १९६० च्या दशकांमध्ये त्यांचे यशस्वी चित्रपट झळकले. शम्मीचा जन्म २१ ऑक्टोबर १९३१ रोजी मुंबईत झाला तेव्हा त्याचे नामकरण शमशेर राज कपूर असे झाले. त्याकाळातील नाटक तसेच सिनेमाचे प्रसिद्ध कलावंत पृथ्वीराज कपूर यांच्या तीन मुलांपैकी शम्मी हे दुसरे अपत्य (दुसरे दोन – राज कपूर आणि शशी कपूर). तीनही भावंडांनी आपल्या वडिलांप्रमाणेच हिंदी सिनेसृष्टीत अपार यश संपादन केले.

शम्मीने अनेक विनोदी, खेळकर, तसेच रोमांचक प्रेमकथांवर आधारित चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका केल्या; इ.स. १९६० च्या दशकात आपल्या आगळ्या नृत्यशैली, तसेच लकबी आणि दिमाखदार व्यक्तिमत्त्वासाठी शम्मी कपूरला बरेच जण भारताचा एल्विस प्रिसली म्हणत.

शम्मीने अभिनयाची सुरुवात गंभीर भूमिकांपासूनच केली, पण फिल्मिस्तानच्या नासिर हुसेन – दिग्दर्शित तुमसा नही देखा (इ.स. १९५७ अमितासोबत) आणि दिल देके देखो (इ.स. १९५९ आशा पारेखसोबत), ह्या चित्रपटांनंतर शम्मीची एका खेळकर प्लेबॉयची प्रतिमा तयार झाली. जंगली (इ.स. १९६१) मुळे ही प्रतिमा वृद्धिंगत होत गेली आणि नंतरचे बहुतेक चित्रपट ह्याच धर्तीवर आधारित होते. शम्मी कपूर हे आपले पार्श्वगायक म्हणून नेहमी मोहम्मद रफीची निवड करीत. मोहम्मद रफी आणि शम्मी कपूर अतिशय चांगले मित्र होते. आपल्या यशाचे श्रेय मोठ्या प्रमाणात मोहम्मद रफीकडे असल्याचे प्रांजळ मत शम्मी कपूर व्यक्त करत. विशेषतः जंगली (इ.स. १९६१) मधील याहू !!! चाहे कोई मुझे जंगली कहे हे सिनेमात शम्मी कपूरच्या धुम–धडाका आणि माकडउड्यांनी तुफान लोकप्रिय झालेले गाणे रफींच्याच आवाजात आहे. गतकाळात शम्मीला प्रसिद्ध अभिनेत्रींबरोबर दुय्यम दर्जाच्या भूमिका पत्कराव्या लागल्या (उदा. मधुबालासोबत रेलका डिब्बा). तरी इ.स. १९६० च्या दशकात निर्माते त्याची जोडी मोठ्या नायिका – विशेषतः आशा पारेख, सायरा बानू आणि शर्मिला टागोर बरोबर बनवीत असत. आपल्या सर्व नायिकांपैकी शर्मिला टागोर, राजश्री आणि आशा पारेख बरोबर सहज काम जमायचे असे ते म्हणत. शम्मी कपूर आणि आशा पारेखची जोडी चार चित्रपटांमध्ये एकत्र दिसली, त्यापैकी तीसरी मंजिल (इ.स. १९६६) हा विजय आनंददिग्दर्शित आणि राहुल देव बर्मन यांचे बहारदार संगीत असलेला थरारक रहस्यपट सर्वांत जास्त गाजला.

शम्मी कपूरांचे नाव भारतातील इंटरनेट वापरणाऱ्या सुरुवातीच्या व्यक्तींमध्ये गणले जाते संदर्भ हवा . ते इंटरनेट यूझर्स कम्युनिटी ऑफ इंडिया (आययूसीआय) या संस्थेचे संस्थापक–चालक होते आणि एथिकल हॅकर्स असोशिएशन यांसारख्या इंटरनेट संस्थांमध्ये कार्यरत होते.

मूत्रपिंडांच्या विकारामुळे ७ ऑगस्ट २०११ रोजी शम्मी कपूर यांना मुंबईच्या ब्रीच कँडी हॉस्पिटलात दाखल करण्यात आले. १४ ऑगस्ट २०११ रोजी त्यांचे निधन झाले.

**(साभार : विकीपिडीया)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : येथील किनाऱ्यावर बुधवारी सायंकाळी निसर्गाने विविध छटा साकारल्या होत्या. या छटा छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी कॅमेऱ्यात बंधिस्त केल्या.**

# आरोग्य प्रहर

## भाजलेला कांदा खाण्याचे फायदे

प्रत्येक अन्नपदार्थामधून आपल्याला वेगवेगळे पोषण मिळत असते. हे पोषण आपल्या शरीराच्या विविध भागांसाठी उपयुक्त असते. म्हणूनच निरोगी आणि पोषक आहार घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. कांद्याचा वापर जवळपास सर्वच पदार्थांमध्ये केला जातो. कांद्याचेही आपल्या शरीराला वेगवेगळे फायदे होतात हे आता सिद्ध झाले आहे. कांद्यामध्ये पोटॅशियम, कॅल्शियम, फॉस्फरस, तांबे असतात.



कांदा हे शिजवून किंवा कच्चाही खाल्ला जातो, मात्र भाजलेला कांदा खाण्याचेही अनेक फायदे आहेत. आज आपण भाजलेला कांदा खाल्ल्याने कोणकोणते फायदे होऊ शकतात याबद्दल जाणून घेऊया.

**चांगली रोगप्रतिकारक शक्ती :** भाजलेल्या कांद्याचे सेवन केल्याने शरीराला जीवनसत्त्वे, फोलेट, पोटॅशियम आणि कॅल्शियमसारखे पोषक तत्व मिळतात. यामुळे आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत होते आणि आपण निरोगी राहतो. व्हिटॅमिन, मिनरल्स, फायबर मुबलक प्रमाणात आढळते, इन्फेक्शन दूर करते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवते.

**मजबूत हाडे :** भाजलेल्या कांद्यामध्ये भरपूर कॅल्शियम आढळते, यामुळे शरीरातील हाडे मजबूत होतात.

**पचनासाठी फायदेशीर :** भाजलेल्या कांद्यामध्ये फायबर मोठ्या प्रमाणावर आढळते. यामुळे आपली पचनक्रिया मजबूत होते आणि पोटाच्या अनेक समस्या दूर होतात. भाजलेल्या कांद्याचे सेवन केल्याने बद्धकोष्ठता, पोटदुखी, पोटात गॅसची समस्या दूर होण्यास मदत होते.

**बॉडी डिटॉक्स होण्यास मदत :** भाजलेल्या कांद्याचे सेवन केल्याने शरीर डिटॉक्स होण्यास मदत होते. भाजलेले कांदे तुम्ही भाज्यांमध्ये किंवा सॅलडमध्ये टाकून खाऊ शकता.

**जळजळ कमी होते :** भाजलेल्या कांद्यामध्ये दाहक–विरोधी गुणधर्म असतात, यामुळे शरीरातील जळजळ कमी होते. कांद्यामध्ये अँटी–ऑक्सिडंट्स, अँटी–इंफ्लेमेटरी सारखे घटक असतात जे जळजळ दूर करण्यात मदत करतात.

**निरोगी किडनी :** भाजलेल्या कांद्यामध्ये आढळणारे पोटॅशियम आणि मिनरल्स किडनीसाठी खूप चांगले मानले जातात. भाजलेले कांदे तणावविरोधी, बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे आणि वेदना कमी करणारे म्हणून ओळखले जातात. तसेच भाजलेला कांदा मधुमेह नियंत्रित करतो.

**(येथे देण्यात आलेली माहिती गृहीतके आणि सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# पोलादपुरात कत्तलीसाठी गुरांची वाहतूक

## दोन वाहने जप्त, चौघे ताब्यात



**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील कापडे येथे सात बैल आणि रेड्यांची कत्तलीसाठी वाहतूक करणारी दोन वाहने दोन पोलादपूर पोलिसांनी बुधवारी (दि. १९) सकाळी ताब्यात घेतली.

पोलादपूर-महाबळेश्वर रोडवरील कापडे गावाच्या हद्दीतील इश्वर ढाब्याजवळ महिंद्रा बोलेरो पिकअप (एमएच-१३,डीक्यू-२७३६) आणि टाटा इंडी व्ही-०३ गाडी (एमएच-१३,डीक्यू-२४६२) ही दोन वाहने पोलादपूर पोलिसांनी बुधवारी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास ताब्यात घेतली. या वाहनांतून पाच बैल आणि दोन रेड्यांची कत्तल करण्याच्या हेतूने वाहतूक करण्यात येत होती.

या दोन्ही वाहनांतील समीर सुरेश भालेराव (वय २०, रा. सरकोली, सोलापूर), अजय सीताराम इंगाले (वय २०, रा. मंगळवेढा, सोलापूर), रवींद्र भानुदास ऐवळे (वय २४, रा. मंगळवेढा, सोलापूर) आणि आशिष अंकुश मोरे (वय २६, रा. दिविल बौध्दवाडी, ता. पोलादपूर) या चार आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना तसेच वाहनाची कागदपत्रे नसल्याचे आढळून आले. याखेरिज, वाहनांतील जनावरांना दुखापत होऊ नये यासाठी खबरदारी घेतली नसल्याचे आणि जनावरे कोणाकडून खरेदी केली याबाबतची कागदपत्रे नसल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यांच्यावर पोलादपूर पोलीस ठाण्यात भादंवि ३७९ आणि ३४ कलमान्वये तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९६४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपनिरिक्षक भोसले करीत आहेत. या वेळी ताब्यात घेतलेल्या पाच बैल आणि दोन रेडे या जनावरांना महाड येथील गोशाळेमध्ये ठेवण्यात आले आहे.

## महाडमधील व्यापाऱ्याकडून ३८५ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त

**महाड : प्रतिनिधी**

बंदी असतानाही प्लास्टिकचा साठा करणाऱ्या महाडमधील एका व्यापाऱ्याकडून ३८५ किलो प्लास्टिक पिशव्या मंगळवारी (दि. १८) जप्त करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व महाड नगर परिषदेने संयुक्तरित्या ही कारवाई केली.

केंद्र सरकारने १ जुलैपासून एकल वापराच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदीचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारनेही या पूर्वी एकल वापराच्या प्लास्टिकवर बंदी घातली होती. परंतु कोरोना काळात यात शिथिलता आली होती. मात्र आता प्लास्टिक बंदीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे. महाड नगर परिषदेच्या वतीने शहरात दवंडी देऊन प्लास्टिक वापर, विक्री, साठा करू नये असे आवाहन करण्यात आले होते. त्यानंतरही प्लास्टिक पिशवीचा वापर सुरु असल्याचे निदर्शनास आल्याने मंगळवारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी संदीप सोनवणे, नगर परिषदेचे अभियंता परेश साळवी व कर्मचारी यांच्या पथकाने महाडमधील व्यापाऱ्यांच्या दुकाने व गोदामांवर छापे टाकले. त्यामध्ये हनीफ मेमन या व्यापाऱ्याच्या घरात साठा केलेला ३८५ किलो प्लास्टिक पिशव्यांचा माल जप्त करण्यात असून नगर परिषदेने हनीफ मेमन यांच्यावर पाच हजार रुपयांची दंडात्मक कारवाई केली.

# माथेरानमध्ये योग्य रस्ते करावेत

## अश्वपालांची आमदारांशी चर्चा, उद्या महत्त्वाची बैठक



**कर्जत : प्रतिनिधी**

माथेरानमधील काही रस्त्यांवर बसविलेल्या पेव्हर ब्लॉकमुळे घोडे घसरतात. त्यात घोड्यांचा मृत्यूही झाला आहे. घोड्यांना सुरक्षितपणे चालता यावे, यासाठी माथेरानमध्ये योग्य रस्ते करावेत, अशी मागणी अश्वपाल संघटनांनी गुरुवारी (दि. २०) आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेऊन केली. त्यावर मार्ग काढण्यासाठी शुक्रवारी एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांसमवेत तातडीची बैठक घेण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला.

स्थानिक अश्वपाल संघटनेच्या अध्यक्षा आशाताई कदम आणि माथेरान मूलवासी संघटनेचे अध्यक्ष संतोष शिंगाडे यांनी गुरुवारी पोसरी येथील शिवतीर्थ कार्यालयात आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली. या वेळी माथेरान नगर परिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे, अभियंता स्वागत बिराबोळे तसेच इरफान शेख, गणेश गावडे, विकास रांजणे, सचिन पाटील, लक्ष्मण शिंगाडे, रामा आखाडे आदी अश्वपालक उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयाने माथेरानमध्ये ई-रिक्षा सुरू कराव्यात असे आदेश दिले आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी माथेरान नगर परिषद प्रयत्न करीत आहे. माथेरानमधील काही चढणीच्या रस्त्यांवर ई-रिक्षा सुरक्षितपणे चढाव्यात म्हणून पेव्हर ब्लॉक बसविण्यात आल्याने पावसाळ्यात काही घोडे घसरले तर एक घोडा मरण पावला. आशा घटना घडू नयेत व त्यावर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी अश्वपाल संघटनांनी या वेळी केली. हे संपूर्ण काम एमएमआरडीए करीत आहे. त्यामुळे या बाबतीत त्यांच्याशी चर्चा करावी, असे प्रशासक भणगे यांनी सूचित केले.

एमएमआरडीएच्या अधिकाऱ्यांसमवेत उद्याच बैठक घेऊन त्यावर चर्चा करून मार्ग काढू, असा शब्द देऊन आमदार महेंद्र थोरवे यांनी, शुक्रवारी सकाळी १० वाजता बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन केले. कर्जतचे नगरसेवक संकेत भासे, बाळासाहेबांची शिवसेनेचे कर्जत तालुका प्रमुख संभाजी जगताप, विधानसभा मतदारसंघ संघटक शिवराम बदे आदी उपस्थित होते.

## पेणजवळ दुचाकीचा अपघात; शिर्की गावातील तरुणाचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा महामार्गावरील पेण रामवाडी ब्रिजवर बुधवारी (दि. १९) रात्री १० वाजण्याच्या सुमारास दुचाकीचा अपघात झाला. त्यात पेण तालुक्यातील शिर्की गावामधील अभिजित गंगाराम पाटील (वय २५) याचा जागीच मृत्यू झाला.

## कंटेनरच्या धडकेत पादचाऱ्याच्या मृत्यू

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद हद्दीतील विहारी गावात गुरुवारी (दि. २०) संध्याकाळी कंटेनरने दिलेल्या धडकेत स्थानिक पादचाऱ्याचा जागीच मृत्यू झाला.

विहारी गावातील प्रल्हाद धनाजी मोरे (वय ७२) हे गुरुवारी संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास जया बारसमोर रस्ता ओलांडत होते. त्यावेळी भरधाव वेगात आलेल्या कंटेनरने त्यांना धडक दिली. या अपघातात प्रल्हाद मोरे यांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची नोंद खोपोली पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, कंटेनर चालकाला पोलीसांनी ताब्यात घेतले आहे.

## नेरळ जिते येथे कर्तृत्ववान महिलांचा सत्कार

**कर्जत : प्रतिनिधी**

समाजात अनेक प्रश्न सोडवण्यासाठी कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान व्हायला हवेत. या हिरकणींच्या पाठीशी उभे राहून त्यांचे कौतुक करायला हवे. भविष्यात या कर्तृत्ववान महिलांकडून समाजासाठी आणखी चांगले काम उभे राहील, असा विश्वास ब्रह्मकुमारी सरलादेवी यांनी नेरळ जवळील जिते येथे व्यक्त केला.



नाशिक येथील साई आधार सोशल हेल्थ फाउंडेशन आणि जिते येथील विठ्ठल रखुमाई मंदिर संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील तीनशेहून अधिक कर्तृत्ववान महिलांना हिरकणी पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. त्यावेळी ब्रम्हकुमारी सरलादेवी मार्गदर्शन करीत होत्या.

नेरळ जवळील जिते येथील देवा रिसॉर्टमध्ये झालेल्या या कार्यक्रमाला हभप मारुती महाराज राणे, अंक शास्त्र आणि वास्तू शास्त्रज्ञ जानकी नाईक, योग रेकॉर्ड करणाऱ्या प्रज्ञा पाटील, मिसेस ग्लोबल २०२० पूनम बिरारी, पोलीस अधीक्षक वर्षा घेवारे यांच्यासह संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख, विजयबुवा घरत, साई आधार फाउंडेशनचे उपाध्यक्ष संतोष धात्रक, सचिव उद्यम सिंह, सहसचिव प्रवीण पाटील, विठ्ठल रखुमाई मंदिर संस्थांनचे संतोष जाधव, मनीषा घरत, विजयालक्ष्मी अहिरे, कल्पना सोनार, राजेश साळी आदी उपस्थित होते.

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E - TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Esti-mated Cost | Sub-mission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-11/22-23/ **RFx No. 7000024906** | AMC for various type of bay maintenance work under 400kV RS (O&M) Division, Nagothane under EHV (O&M) Circle, Panvel 1st Ext. | Limited to Rs. 25 Lakhs | 27.10.2022 up to 23.59 hrs |

**EMD:**1% of Estimated Cost **Tender fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**RE-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors / agencies on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in** for following work

| **Tender No.:** EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Re-Ten-5/22-23 **(RFx No. 7000025021)** | | | **Period for Submission of E-Bid:** 20.10.2022 to 27.10.2022 up to 23:59Hrs | | |
|---|---|---|---|---|---|
| **Name of Work:** Replacement of existing damaged 400kV 0.5 ACSR Quadruple Bus conductor Span at 400kV RS, Kharghar | | | | | |
| **Estimated Cost** | **EMD** | **Tender Fee** | **Closing Date** | **Technical Opening Date** | **Commercial Opening Date** |
| Rs. 14,30,827.87/- (Including GST) | Rs. 14308.28/- | Rs. 500/- + GST | 27.10.2022 up to 23:59 Hrs | 28.10.2022 at 10:00 Hrs (If possible) | 28.10.2022 at 10:15 Hrs (If possible) |
| **Contact Persons:** 1) Mr. S.J.Darekar, Executive Engineer-Charge, 400kV RS O&M Dn., Kharghar, 9619892040 2) Ms. P.C.Deshpande, Dy. EE (O), 400kV RS O&M Dn., Kharghar, 9819313988. For further details, visit our website **www.mahatransco.in** | | | | | |

1) Tender documents can be downloaded by only online from aforesaid website.

2) Eligible contractor should submit their bid well in advance instead of waiting till last date.

**MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.**

**Note:** All eligible interested contractors are mandated to get enrolled on SRM E-Tender portal (New) - **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV R.S. (O&M) Dn., Kharghar**

**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**Re-E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees: Rs. 500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No: 7000024614** Tender No: **EE/EHV (O&M)/DN/PNL/Re-e-Tender-47/2022-2023.** RFx Re-E-Tender for work of supply, laying and fixing of additional power cable to 220/33/22kV Transformer-1,2 & 3 at 220kV ONGC Panvel Substation under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount:** Rs. 9,78,090/- **EMD Amount:** Rs. 9,781/- |
| 2 | **Online Downloading of the RFx** | 20.10.2022, 18:00 Hrs to 27.10.2022, 23:59 Hrs |
| 3 | **Online Submission of the RFx** | On or Before 27.10.2022 up to 23:59 Hrs |
| 4 | **Online Opening of the Techno Commercial RFx** | 28.10.2022 at 11:00 Hrs (if Possible) |

For further details, visit our website: **https://srmetender.mahatransco.in Contact Person:** The ADDL. Executive Engineer, (O): Phone No. 022-2746 5410.

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV(O&M) Dn., PANVEL**

# रातवड माध्यमिक शाळेत दीपोत्सव

## विद्यार्थ्यांनी बनविले आकशकंदिल, भेटकार्ड, किल्ले

**माणगाव : प्रतिनिधी**

शैक्षणिक क्षेत्रात ज्ञानरचनावादी उपक्रम राबविणाऱ्या रातवड येथील माध्यमिक विद्यामंदिर शाळेत दीपावली निमित्ताने विविध उपक्रम व दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.



प्रथमसत्र परीक्षेनंतर साजऱ्या होणाऱ्या दीपावली उत्सवाचे औचित्य साधून रातवड विद्यालयात आकशकंदिल, भेटकार्ड व किल्ले बनविण्याची कार्यशाळा घेण्यात आली. परीक्षेनंतर विद्यार्थी सुट्टीला जाण्यापूर्वी घेतलेल्या या दोन दिवशीय कार्यशाळेत पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यांनी आकशकंदिल, भेटकार्ड व किल्ले तयार केले. त्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

यावर्षी विद्यार्थ्यांनी एकूण चार किल्ले बांधले होते. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांनी जलदुर्ग जंजिरा, सहावीच्या विद्यार्थ्यांनी कर्नाळा किल्ला, सातवीच्या विद्यार्थ्यांनी कुलाबा आणि आठवीच्या विद्यार्थ्यांनी प्रतापगड या किल्ल्यांची प्रतिकृती तयार केली होती. सर्व विद्यार्थ्यांनी किल्ल्यांची सजावट करून दीपोत्सव साजरा केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस विद्यालयात लेझीम पथकासह छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. या वेळी विद्यार्थ्यांनी फटाके वाजविले व खाऊवाटप करून आनंद व्यक्त केला.

मुख्याध्यापक एम. एस. जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेत राबविलेल्या या उपक्रमातून प्रेरणा घेऊन अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या घरीसुद्धा किल्ले व आकशकंदिल बनविले. घरी बनविलेल्या आकशकंदिल व किल्ल्यांमुळे पालकांनी समाधान व्यक्त केले.

# किल्ले बनविण्यात बच्चेकंपनी दंग

## दिवाळीसाठी मातीचे मावळे, महाराजांच्या पुतळ्यांना पसंती

**पाली : प्रतिनिधी**

दिवाळीच्या सुटीत सुधागड तालुक्यातील बहुसंख्य गावांतील बच्चे कंपनी मातीचे किल्ले बनविण्यात दंग झाल्याचे दिसत आहे. यावर्षी कोरोनाचे सावट सरले असून कोणतेच निर्बंध नसल्याने रेडिमेड किल्ले, मातीचे मावळे व प्राणी आणि महाराजांचे पुतळे बाजारात मोठ्या प्रमाणात दाखल झाल्या आहेत. रेडिमेड किल्लेसुद्धा विक्रीला आले आहेत. मात्र बच्चे कंपनीचा कल मातीचे किल्ले बनविण्याकडेच आहे.

मागील वर्षीच्या तुलनेत यंदा मातीचे मावळे व प्राण्यांच्या किंमती १० ते २० टक्क्यांनी वधारल्या आहेत. तरीही उठाव अधिक आहे. पालीतील कारागीर नारायण बिरवाडकर यांनी सांगितले की, कोरोनामुळे व्यवसाय ठप्प झाला होता, पुतळ्यांची विक्री निम्म्यापेक्षा अधिकने घटली होती. यंदा विक्री चांगल्या प्रकारे होत आहे, पण परतीच्या पावसामुळे तयार मूर्ती खराब होण्याची व नुकसानीची भीती आहे, असे बिरवाडकर म्हणाले.



### स्वतः किल्ले बनविण्याकडे कल

डोंगर, माळरान व शेतातून लाल किंवा काळी माती घमेल्यात किंवा पोत्यामध्ये टाकून आणायची आणि सर्व मित्र मंडळी मिळून किल्ला बनविण्याची मज्जा काही औरच आहे. हा आनंद गाव व खेड्यातील तर काही प्रमाणात शहरातील मुले घेतात. किल्ल्याला मावळे, सैनिक, प्राणी व रंग यांनी सजवायचे. त्यावर पाण्याचे कारंजे लावायचे. मोहरी टाकून गवत उगवायचे. रात्री किल्ल्यावर रोशनाई करायची असा उपक्रम दिवाळीत अनेक गावातील मुले करतात. बच्चे कंपनीसह मोठेदेखील यामध्ये सहभागी होतात.

### मातीचे युध्दसाहित्यही उपलब्ध

मातीच्या किल्ल्यावर ठेवण्यासाठी प्लास्टिकपेक्षा मातीच्या पुतळ्यांना मागणी आहे. बाजारात छत्रपती शिवाजी महाराज व मावळ्यांच्या विविध आकाराच्या, मुद्रांच्या आणि रंगांचे पुतळे उपलब्ध आहेत. याबरोबरच मातीच्या ढाल, तोफादेखील उपलब्ध आहेत. विविध देवीदेवता, हत्ती, वाघ, बैल इत्यादी प्राणीसुद्धा मिळत आहेत.

**दिवाळीत मातीचा किल्ला बनवायला खूप आवडते. किल्ला व त्यावर महाराजांची मूर्ती, मातीचे मावळे विराजमान झालेले खूप आवडतात. किल्ला बनवितांना खूप मज्जा येते.**
**-स्पंदन शिंदे, विद्यार्थी, पाली, ता. सुधागड**

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजने अंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे इरादापत्र दिले असून वाटपपत्र व करारनामा करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटप/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | वाटप / करारनामा संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यस्थितीनुसार संपादित जमिनीशीसंबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. उरण, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | पाणजे/ २१३० | १११/८६ -८७ | १/३६ | ०-५-३ | ४० चौ.मी. | द्रोणागिरी येथील सेक्टर क्र ४८, भूखंड क्रं. १२३A, क्षेत्र- ४० चौ.मी. या इरादित भूखंडाची वाटपाची पुढील प्रक्रिया सुरु आहे. | **मूळ भूधारक अंबीबाई काशिनाथ पाटील (मयत) यांचे वारस-** १) नंदलाल काशीनाथ पाटील २) लक्ष्मण काशीनाथ पाटील ३) विमल काशीनाथ पाटील | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संपादित जमिनीबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करुन करारनामा करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जांची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(रायगड)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**सिडको/जनसंपर्क/३०४/२०२२-२३**

# नवी मुंबईत साकारतेय बहुउद्देशीय संकुल

## बस टर्मिनसद्वारे नागरी सुविधेत लक्षणीय भर

**नवी मुंबई : बातमीदार**

आधुनिक शहर, स्वच्छ व सुंदर शहर, इको सिटी, एज्युकेशनल हब अशी नवी मुंबई शहराची वेगवेगळी ओळख जनमानसात रुढ असून येथील अनेक खेळाडू राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर उत्तम कामगिरी करीत असल्यामुळे 'स्पोर्ट्स सिटी' अशीही नवी मुंबईची वेगळी ओळख प्रचलीत होताना दिसते आहे. वाशी सेक्टर १२ येथील भू.क्र.१९६ व १९६ ए हे भूखंड अनुक्रमे नमुंमपा परिवहन उपक्रमास आणि नवी मुंबई महापालिकेस बस टर्मिनस तसेच आंतरक्रीडा संकुल व जलतरण तलाव या सार्वजनिक सुविधांकरिता सिडकोमार्फत हस्तांरित करण्यात आले आहेत. याठिकाणी एकात्मिकपणे बसस्थानक, वाणिज्य संकुल, आंतरक्रीडा संकुल व ऑलिम्पिक साईजचा तरण तलाव विकसित करण्याचे काम सुरू झाले असून तळमजला अधिक आठ मजले उंच अशी ही इमारत सप्टेंबर २०२३मध्ये पूर्ण होणार आहे. याठिकाणी सद्यस्थितीत तिसऱ्या मजल्याचे काम प्रगतीपथावर आहे.





या इमारतीत तळमजल्यावर बसस्थानक, इलेक्ट्रिक चार्जिंग स्टेशन, एनएमएमटी कंट्रोल रूम, स्पेअरपार्ट्स, स्टोरेज रूम, फुडकोर्ट, मलप्रक्रिया केंद्र, रेन वॉटर हार्वेस्टिंग टँक अशा प्रकारची व्यवस्था आहे. याशिवाय पहिला, दुसरा, तिसरा (काही भाग) मजल्यावर चारचाकी व दुचाकी वाहनतळाची व्यवस्था, तिसऱ्या मजल्याच्या उर्वरीत भागात स्पोर्ट्स हॉल, योगारूम अशा सुविधा उपलब्ध आहेत. याशिवाय फिल्टरेशन प्लांट व बॅलन्सिंग टँकची व्यवस्था आहे.

चौथ्या मजल्यावर २५ × ५० मी. आकारमानाचा ऑलिम्पिक आकाराचा मोठा तरणतलाव असणार आहे. तरणतलावाच्या पाण्याचे शुध्दीकरण करण्याकरिता क्लोरिनसह ओझोनाईझ तंत्रज्ञानाचा वापर केला जाणार असून ते शरीरास अपायकारक नाही. चौथ्या मजल्यावरील उर्वरित भागात कॅफेटेरिया, जीम, मेडिटेशन सुविधा, प्रथमोपचार कक्ष, कॉस्च्युम रुम, व्हिआयपी लाँज, डेक एरिया, शॉवर रुम, मसाज रूम, लॉकर, चेंजींग रूम व प्रसाधनगृहाची व्यवस्था असणार आहे.

या इमारतीच्या पाचव्या मजल्यावर आंतरक्रीडा कक्ष, योग कक्ष, मिडिया रुम, स्पोर्ट्स हॉल असून सहाव्या व सातव्या मजल्यावर एनएमएमटी कार्यालये तसेच आठव्या मजल्यावर बँक्वेट हॉलची व्यवस्था आहे. त्याचप्रमाणे छतावर ऑनग्रीड सोलरपॅनल बसविण्यात येणार असून त्यामधून साधारणतः १८८ किलो वॅट वीज निर्मिती होऊन या इमारतीच्या वीज खर्चात लक्षणीय बचत होणार आहे.

या बहुउपयोगी भव्यतम वास्तूतील ऑलिम्पिक दर्जाचा जलतरण तलाव तसेच आंतरक्रीडा संकुल यामुळे नवी मुंबईकर नागरिकांना माफक दरात आंतरक्रीडा खेळांच्या तसेच जलतरणाच्या दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे. त्याचप्रमाणे नागरिकांच्या सेवेसाठी महत्वाचा असलेला परिवहन उपक्रम इंधन दर व इतर बाबींमुळे तोट्यात असूनही चालविला जात असून नवी मुंबई महानगरपालिकेकडून उपक्रमास आर्थिक मदत घ्यावी लागत आहे.

**बहुउपयोगी वास्तू**

इमारतीमधील दुकाने, कार्यालये यामधून मिळणाऱ्या नियमित भाड्यांमुळे परिवहन उपक्रमाचे आर्थिक सक्षमीकरण होणार असून ही इमारत उभारण्यासाठी झालेला खर्च या भाड्यामधून साधारणतः ११ वर्षामध्ये वसूल होणार आहे. त्यामुळे नवी मुंबईच्या नागरिकांसाठी शाश्वत सुविधा उपलब्ध करून देणारी बस स्थानक, वाणिज्य संकुल, आंतरक्रीडा संकुल व ऑलिंपीक आकाराचा जलतरण तलाव असलेली ही भव्यतम वास्तू बहुउपयोगी असणार आहे.

# पावसाच्या लहरीपणामुळे रब्बी पिकांचा हंगामही लांबणीवर

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील कळंबुसरे, कोप्रोली, दिघाटी, केळवणे, साई तसेच अन्य भागातील शेतकऱ्यांच्या रब्बी पिकांच्या पेरणीची कामे परतीच्या पावसाचा जोर कायम असल्यामुळे लांबणीवर जाणार असल्याचे मत चिरनेरचे कृषीमित्र शेतकरी प्रफुल्ल खारपाटील यांनी व्यक्त केले.

यंदाही परतीचा पावसाचा प्रवास विलंबाने होत आहे. त्यामुळे परिसरातील काही ठिकाणच्या भात खाचरात अजूनही गुडघाभर पाणी असल्यामुळे भात पिकांच्या कापणीची कामे लांबणीवर जाणार आहेत. याचा फटका रब्बी पिकांच्या पेरणीला बसणार आहे. सध्या काही ठिकाणी भात पिके तयार होऊन कापणीला आली आहेत, तर काही भातपिके अजून हिरवीच असून ती तयार होण्याच्या स्थितीत आहेत. यंदा राज्यात सर्वदूर मोसमी पाऊस बरसला. पावसाचा जोर कायम असल्यामुळे भातपिकांच्या खाचरात अद्याप पाणी व चिखल आहे. येथील काही शेतकऱ्यांच्या शिवारातील नवीन संकरित जातीची भात पिके अजून पूर्ण तयार झाली नाहीत. शिवाय यातील काही पिकांची उंची व वाढ झपाट्याने झाली असल्यामुळे बऱ्याच ठिकाणच्या भातखाचरातील उंच वाढलेली पिके खाली कोसळून पडली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

परतीच्या पावसामुळे कापणीचा हंगाम पुढे गेला आहे. पाऊस थांबला तर कापणीला सुरुवात होऊन नोव्हेंबरअखेर रब्बी पिकांच्या पेरणीला सुरुवात करता येईल, मात्र पाऊसाच्या लहरीपणामुळे कापणीचा व रब्बी पिकांच्या पेरणीचा हंगाम लांबणीवर जात असल्यामुळे येथील शेतकरी संकटात सापडला आहे. शासनाने प्रत्यक्ष पिकांची पाहणी करून पंचनामे करावेत, अशी मागणी कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील व परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.



# वाशीमध्ये तरुणी बेपत्ता

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाशी सेक्टर-१मधील गणेश टॉवर इमारतीत घरकाम करणारी २० वर्षीय तरुणी बेपत्ता झाली आहे. नेहा विटकर असे या तरुणीचे नाव असून वाशी पोलीस ठाण्यात या प्रकरणी नोंद करण्यात आली आहे.

या घटनेतील बेपत्ता झालेली नेहा ही मूळची नाशिक जिह्यातील असून ती वाशी सेक्टर-१मधील गणेश टॉवर इमारतीत एका कुटुंबीयांच्या घरात घरकाम करत होती. ७ ऑक्टोबर रोजी नेहा राहत असलेल्या घरातील कुटुंबीय बाहेरगावी गेले होते. त्यामुळे नेहा घरामध्ये एकटीच असताना ती अचानक बेपत्ता झाली. दुसऱ्या दिवशी घरातील कुटुंबीय परतले असता त्यांना नेहा घरात नसल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे त्यांनी तिचा सर्वत्र शोध घेतला, मात्र ती कुठेच सापडली नसल्याने या प्रकरणी वाशी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. नेहाची उंची सुमारे पाच फूट असून, तिचा रंग गोरा असून तिच्या उजव्या हाताच्या कोपराजवळ नेहा असे गोंदलेले आहे. नेहाने अंगात गुलाबी टॉप व लेगीज घातली आहे. या वर्णनाची तरुणी कुणाला सापडल्यास त्यांनी वाशी पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# कोकण विभागीय पेन्शन अदालत ९ नोव्हेंबरला

**नवी मुंबई :** कोकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोकण भवन येथे आयोजित करण्यात आली आहे.

पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास या दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे, असे उपायुक्त (सामान्य प्रशासन) कोकण विभाग यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे.

# पुनाडे आदिवासी विद्यार्थ्यांना वस्तूंचे वाटप

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील पुनाडे आदिवासी वाडी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना कामोठे येथील पुष्पकलश सोसायटीतील रहिवासी संजय हडवले यांच्या कन्या श्रीशा हीच्या पहिल्या वाढदिवसानिमित्त गोडेतेल, साखर, रवा, डाळ, तांदूळ या जीवनावश्यक वस्तूंचे व खाऊचे वाटप करण्यात आले.



दिवाळीच्या ऐन सनाच्या वेळी मिळालेल्या जीवनाश्यक वस्तू व खाऊ यामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पहाण्यासारखा होता. या वेळी महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान पाणदिवेचे संस्थापक अध्यक्ष रायगड भूषण मनोज पाटील, संजय हडवळे, लता हडवळे, सुप्रिया हडवळे, मानसी पाटील, शाळेचे मुख्याध्यापक दिलीप म्हात्रे, शिक्षक संदिप भोपरे आदी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये विद्यार्थ्यांनी राबवली स्वच्छता मोहीम; जमा कचरा पालिकेकडे सुपूर्द



**पनवेल : वार्ताहर**

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियानाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेतर्फे विविध उपक्रम राबविले जात आहेत. पनवेल शहरातील विविध चौकांमध्ये सकाळी अत्यंत वर्दळीच्या वेळेत काही किशोरवयीन विद्यार्थ्यांनी कचरा जमा करून हा परिसर स्वच्छ केला. पिल्लई कॉलेज आणि नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांनी ही स्वच्छता मोहीम राबवली.

पनवेल शहरात सध्या दिवाळीच्या पार्श्वभूमीवर खरेदीची रेलचेल सुरू आहे. पनवेल शहरात नागरिकांसोबत वाहनांचीही गर्दी आहे. सकाळी नऊ वाजता गर्दीला सुरुवात होत असतानाच बारावीचे २५ विद्यार्थी रस्त्यावर पडलेला कचरा हाताने जमा करीत होते. पनवेलशहरातील हुतात्मा गार्डन, शिवाजी चौक, कर्मवीर भाऊराव पाटील चौक, लेंडाळे तलाव आदी परिसरात या विद्यार्थ्यांनी सकाळी १२ वाजेपर्यंत स्वच्छता मोहीम राबवली.

नेहरू युवा केंद्राच्या रायगड जिल्हा विभागाकडून राबविण्यात आलेल्या मोहिमेत नेहरू युवा केंद्राचे राज्य संघटक प्रकाश कुमार मनोरे यांच्यासह रायगड विभागाचे जिल्हा युवा अधिकारी निशांत रोतेला, पिल्लई कॉलेजच्या डॉ. किरण देशमुख, इन्फिनिटी फाऊंडेशनचे सदस्य आणि राष्ट्रीय युथ स्वयंसेवक आयुफ आकुला आदी मान्यवर या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते.

महाराष्ट्रभर ३१ ऑक्टोबरपर्यंत ही मोहीम राबविली जाणार असून चार लाख किलो कचरा जमा करण्याचे लक्ष्य असल्याचे यावेळी आयोजकांनी सांगितले. पनवेलमध्ये केलेल्या स्वच्छता मोहिमेत जमा झालेला कचरा पनवेल महापालिकेच्या घंटागाडीकडे सुपूर्द करण्यात आला.

# नवी मुंबईकरांवर कचरा वर्गीकरणाचे संस्कार

**नवी मुंबई : बातमीदार**

घनकचरा व्यवस्थापनातील सर्वात महत्वाचा भाग हा कच-याचे निर्मितीच्याच ठिकाणी केले जाणारे ओला, सुका व घरगुती घातक असे तीन प्रकारे वर्गीकरण असून नवी मुंबईकर नागरिक यामध्ये स्वयंस्फुर्तीने कचरा वर्गीकरण करण्यासाठी पुढाकार घेताना दिसतात.

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशनमार्फत स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत ओला व सुका कचरा याविषयी व्यापक स्वरुपात जनजागृती करण्यासाठी स्वच्छता के दो रंग ही मोहीम १७ ते २२ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्याचे निश्चित करण्यात आले असून त्या अनुषंगाने नवी मुंबई महापालिकेने याकामी आघाडी घेतली आहे.


याबाबत मुलांमधील मोबाइल गेम्सची आवड लक्षात घेऊन हसत खेळत कचरा वर्गीकरणाचे महत्व मुलांपर्यंत पोहचविण्यासाठी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या हस्ते इन्स्टाग्रामवर प्ले - वेस्ट सेग्रीगेशन (सेग्रीगेट यूअर वेस्ट) हा कचरा वर्गीकरणाविषयीचा स्पेशल गेम लाँच करण्यात आला. याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे उपस्थित होते.

या गेममध्ये ओल्या कचऱ्यामध्ये कोणते घटक येतात व सुक्या कचऱ्यामध्ये कोणते घटक येतात याविषयीचे मुलांचे ज्ञान जाणून घेण्यात येणार आहे. इन्स्टाग्रामवर लाँच केलेल्या प्ले - वेस्ट सेग्रीगेशन (सेग्रीगेट यूअर वेस्ट) हा गेम खेळण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या पाालेपश्रळपश या इन्स्टाग्राम पेजवर जाऊन अथवा https://www.instagram.com/ar/634271571616316 ऑनलाइन लिंकवर जाऊन सहजपणे कचरा वर्गीकरणाचा हा गेम खेळता येऊ शकतो.

या गेमच्या सुरुवातीला लिंकवर क्लिक केल्यानंतर गेम खेळणाऱ्या व्यक्तीच्या डोक्यावर मुकुट दिसू लागेल व त्या मुकुटाच्या एका बाजूला ओलू म्हणजे ओला कचरा व दुसऱ्या बाजुला सुकू म्हणजेच सुका कचरा याचे आयकॉन दिसतील. मुकुटाच्या मध्यभागी एकेक करून कागद, फुले, फळे अशा साहित्याची नावे दिसतील. त्यामधील ओल्या कचऱ्यात जाणारे साहित्य कुठले व सुक्या कचऱ्यात जाणारे साहित्य कुठले हे ओळखून मुलांनी डाव्या किंवा उजव्या बाजूला मान झुकवली की योग्य उत्तरानुसार त्यांना मिळालेले गुण प्रदर्शित होतात. यामुळे मुलांना कोणता कचरा कोणत्या डब्यात याविषयीचे कचरा वर्गीकरणाचे आपोआप ज्ञान मिळणार असून हसत खेळत कचरा वर्गीकरणाची माहिती प्राप्त होणार आहे.

लहान वयापासूनच मुलांवर स्वच्छतेचे संस्कार करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका आरंभापासूनच कार्यरत आहे. या अनुषंगाने नुकत्याच झालेल्या राजीव गांधी स्टेडियम सीबीडी बेलापूर येथील इंडियन स्वच्छता लीगच्या भव्यतम विक्रमी कार्यक्रमात नवी मुंबई इको क्नाईट्स संघाचे कर्णधार, सुप्रसिध्द गायक संगीतकार पद्मश्री शंकर महादेवन यांच्या उपस्थितीत घनकचरा वर्गीकरणाविषयी जनजागृतीपर व्हिडिओ क्लिपचे अनावरण करण्यात आले होते.

लहान मुलांमध्ये असलेली कार्टून्सची आवड लक्षात घेऊन या व्हिड़िओ क्लिपमध्ये ओल्या कचऱ्यासाठी ओलू आणि सुक्या कचऱ्यासाठी सुकू ही कच-याच्या डब्याच्या आकाराची दोन कार्टून पात्रे प्रदर्शित करण्यात आली होती. याद्वारे उरलेले अन्नपदार्थ, फळांच्या साली, भाज्या, फुले असा कचरा ओलू म्हणजेच ओला कचरा आहे आणि कागद, काच, टाकाऊ स्टेशनरी साहित्य, धातूचे साहित्य हे सर्व सुकू म्हणजेच सुका कचरा आहे अशी महत्वाची माहिती कार्टून्सद्वारे मुलांपर्यंत पोहचविण्यात आली होती. याशिवाय डायपर, सिरींज, सॅनिटरी नॅपकीन असे साहित्य घातकू' म्हणजेच घरगुती घातक कचरा आहे ही माहिती काळ्या रंगाचा कार्टून पात्र स्वरुपातील कचऱ्याचा डबा प्रदर्शित करीत मुलांना देण्यात आलेली होती.



**मोबाइल गेमद्वारे जनजागृती**

*केंद्र सरकारच्या स्वच्छता के दो रंग या मोहिमेअंतर्गत ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवण्याविषयी 'ओलू' व 'सुकू' या नवी मुंबई महापालिकेने प्रदर्शित केलेल्या कार्टून पात्रांची मुलांमधली लोकप्रियता लक्षात घेऊन तसेच मुलांना असलेली मोबाइल गेमची आवड लक्षात घेऊन वैशिष्ट्यपूर्ण रितीने प्ले-वेस्ट सेग्रीगेशन या इन्स्टाग्रामवरील खेळाची रचना करण्यात आलेली आहे. असून नवी मुंबईतील हुशार मुले स्वत: हा खेळ खेळून ओल्या कचऱ्यात कोणते साहित्य व सुक्या कचऱ्यात कोणते साहित्य याविषयी आपल्याला असलेल्या माहितीची खेळाद्वारे खातरजमा करून घेतलीच, याशिवाय आपल्या पालकांनाही हा खेळ खेळायला लावून त्यांनाही कचरा वर्गीकरणाचे महत्त्व जाणवून देतील, असा विश्वास महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी व्यक्त केला आहे.*

# रयत बँकेचे नवनिर्वाचित संचालक किशोर पाटील यांचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सेवकांची अर्थवाहिनी असणाऱ्या रयत को ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीत अत्यंत चुरशीच्या लढतीत रयत शिक्षण संस्थेच्या वाशी शाखा कार्यक्षेत्रातून प्रा. किशोर पाटील निवडून आल्याबद्दल येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या वतीने प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले यांनी त्यांचा सत्कार केला.

या वेळी रयत सेवक संघाचे समन्वयक बँकेचे माजी व्हाईस चेअरमन नुरा शेख, विद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले, 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्यद्वय प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, कार्यालयीन लेखनिक चंद्रकांत मढवी, ग्रंथपाल महेश म्हात्रे आदी उपस्थित होते. उपशिक्षक सागर रंधवे यांनी प्रास्ताविक केले तर संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर यांनी आभार मानले.






**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.

येत्या रविवारी, २३ ऑक्टोबर २०२२ रोजी वाचूया त्रिदिव, कर्जत येथील अनुपमा कुळकर्णी (सध्या वास्तव्य अमेरिका) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# ममदापुरवाडी ग्रामस्थांचा हंडा मोर्चा

## एका महिन्यात पाणी देण्याचे ग्रामपंचायतीचे आश्वासन




**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील ममदापुरवाडीमधील ग्रामस्थांनी पिण्याच्या पाण्यासाठी गुरुवारी (दि. २०) ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढला होता. या वेळी आदिवासी ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत पदाधिकारी यांच्यात शाब्दिक बाचाबाची झाली. शेवटी महिन्याभरात पिण्याचे पाणी ममदापुरवाडीमध्ये पोहचेल, असे आश्वासन सरपंचांकडून देण्यात आले.

ममदापूर ग्रुपग्रामपंचायतीची नळपाणी योजना आहे. मात्र या योजनेचे पाणी ग्रामपंचायत हद्दीतील ममदापुरवाडीपर्यंत पोहचत नाही. नवीन नळपाणी योजनेची सर्व कामे पूर्ण होत नाहीत, तोवर नवीन नळपाणी योजनेचे पाणी कोणालाही देऊ नये, असा ठराव ऑगस्ट महिन्यातील ग्रामसभेत घेण्यात आला होता. असे असतानादेखील ममदापूर ग्रामपंचायतीमधील बिल्डर लॉबीला नळजोडण्या देण्यात आल्या असून, त्या ठिकाणी नवीन नळपाणी योजनेचे पाणी सुरु असल्याने ममदापुरवाडीमधील आदिवासी ग्रामस्थांनी गुरुवारी ग्रामपंचायत कार्यालयावर हंडा मोर्चा काढला होता.

हिरु निरगुडे, दशरथ निरगुडे, ग्रामपंचायत माजी सदस्य राजू झुगरे यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात आदिवासी महिला डोक्यावर हांडे घेऊन सहभागी झाल्या होत्या. ग्रामपंचायत कार्यालयाबाहेर मोर्चेकरी ग्रामस्थांची घोषणाबाजी सुरु असताना ग्रामपंचायत कार्यलयात चार मोर्चेकऱ्यांनी यावे, अशी सूचना करण्यात आली.

ग्रामपंचायत कार्यालयात बसलेले सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांनी बाहेर यावे आणि चर्चा करावी, अशी मागणी मोर्चेकऱ्यांनी केली. त्यानंतर सरपंच दामा निरगुडा, उपसरपंच नंदिनी शिनारे, ग्रामपंचायत सदस्य भिकाजी निर्गुडा, अनिकेत गायकवाड, जुबेर पालटे, कल्पना डांगरे आणि चंद्रकांत शिनारे यांनी कार्यालयाबाहेर बाहेर येऊन मोर्चेकऱ्यांच्या समस्या समजून घेतल्या. यावेळी काही विषयांवर मोर्चेकरी आणि ग्रामपंचायत सदस्य व पदाधिकारी यांच्यात शाब्दिक बाचाबाचीदेखील झाली. शेवटी महिन्याभरात सर्व उर्वरित कामे पूर्ण करून ममदापुरवाडीपर्यंत पाणी पोहचवले जाईल, असे तोंडी आश्वासन देण्यात आले. त्यावर मोर्चेकऱ्यांनी आश्वासन लेखी देण्याची मागणी केली असता ग्रामविकास अधिकारी हे कार्यालयात नसल्याने ते आल्यावर लेखी पत्र दिले जाईल, असे सांगण्यात आले.

# जिल्हा टीबी फोरम समन्वय समितीची आढावा बैठक



**अलिबाग : जिमाका**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा टीबी फोरम समन्वय समिती व जिल्हा कोमॉर्बिडीटी समन्वय समितीची सभा नुकतीच उपजिल्हाधिकारी सर्जेराव मस्के-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.

जिल्ह्यातील क्षयरुग्णांची स्थिती, त्यांच्याकरिता असणाऱ्या योजनांची माहिती, त्यांना आर्थिक लाभ घेताना येणाऱ्या अडचणी, नि:क्षय मित्र याविषयी सभेत माहिती देण्यात आली. प्रधानमंत्री टीबीमुक्त अभियान या महत्वाकांक्षी योजनेची सुरुवात ९ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आली. या योजनेद्वारे क्षयरुग्णांना उपचार सुरू असेपर्यंत त्यांना दत्तक घेऊन पोषक व सकस आहार वाटप करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

नि:क्षय मित्र होऊन क्षयरुग्णांना सहाय्य करावे, असे आवाहन करणारे परिपत्रक जिल्हाधिकारी डॉ. कल्याणकर यांनी जारी केले होते. या आवाहनास जिल्ह्यातील विविध क्षेत्रांनी उत्तम प्रतिसाद दिला. जिल्ह्यात आतापर्यंत दहा नि:क्षय मित्र झाले असून, २८३ क्षयरुग्णांना पोषक आहार व सकस आहार देण्यात येत आहे. क्षयरुग्णांसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन महाड येथील सरपंच सोमनाथ ओझर्डे यांचा राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते नुकताच सत्कारही करण्यात आला आहे. जिल्ह्यातील विविध कंपन्या, संस्था, लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेऊन जिल्ह्यातील क्षयरुग्णांना दत्तक घेऊन, त्यांना उपचार सुरू असेपर्यंत पोषक आहार व इतर सहाय्य उपलब्ध करून द्यावेत, असे आवाहन या बैठकीच्या माध्यमातून करण्यात आले.

रायगड जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वंदन पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश ठोकळ, प्रा. डॉ. अश्लेषा तावडे, डॉ. प्रताप शिंदे, डॉ. अशोक कटारे, अलिबाग मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. विनायक पाटील, डॉ. शितल जोशी, डॉ. पावनकर, संजय माने, सतीश दंतराव, लोकपरिषद,-पनवेल या संस्थेचे अशोक गायकवाड, महाराष्ट्र सामाजिक विकास ट्रस्ट-पेणचे मनोज गावंड, आधार ट्रस्ट-रोहाचे विजय नायर, विहान ट्रस्ट-पनवेलचे सुनील पटेल, हुमाना संस्थेचे प्रतिनिधी जहांगीर आलम, कॉर्पोरेट प्रतिनिधी संतोष पाटील, जेएसडब्ल्यू कंपनीचे प्रतिनिधीसुधीर तेलंग हे मान्यवर तसेच किर्तीकांत पाटील, दत्तात्रेय शिंदे, राम गोल्हार, राजू पालवनकर हे कर्मचारी या बैठकीला उपस्थित होते.

# परंपरागत शेती परवडेनाशी

## खर्चापेक्षा उत्पन्न कमी, शेती खर्चासह मजुरी वाढली



**खोपोली : प्रतिनिधी**

यावर्षी दिवाळी तोंडावर आली, तरीही पाऊस पडतो आहे. एकीकडे भात कापणीला आला आहे, मात्र शेतात पाणी असल्याने कापणी रखडली असून, भातपीक शेतात आडवे होत आहे. नैसर्गिक आपत्ती, मजुरांची टंचाई व वाढलेले दर यामुळे शेती परवडणारी राहिली नसल्याची प्रतिक्रिया शेतकरी वर्गात उमटत आहे.

खर्च अधिक व उत्पादन कमी अशी अवस्था भात शेतीची झाली आहे. पारंपरिक शेतकरी परंपरा कायम ठेवण्यासाठी शेती करीत असले तरी बदलल्या स्थितीत हे सर्व तोट्यात जात आहेत. भात पिकवण्याकरिता दर खंडी पिकासाठी शेतकऱ्याला ११ ते १२ हजारांच्या आसपास खर्च येत असतो. भात पेरणीपासून भात लागवडीपर्यत शेतकऱ्यांना जमीन नांगरणीकरीता एक नांगराला दिवसाला ६०० ते ७०० रुपये द्यावे लागत असून टक्ट्रर व चालक ही एका तासाला ४५० ते ६०० रुपये घेतो. शेत मजुराच्या मजुरीचे दर दिवसाला पुरुषासाठी ३०० ते ३५० रुपये तर स्त्रीयांसाठी २७० ते ३०० रुपये आहेत. शिवाय मजुरांना सकाळी चहा-न्याहारी, दुपारचे जेवण व संध्याकाळी पोस्त द्यावा लागतो. बेणनी काढणे, खते-औषधे फवारणी करण्याकरिता अधिक पैसे मोजावे लागतात. त्यामुळे भात उत्पादनाकरिता जेवढा खर्च होतो, तेवढ्या खर्चाचे पीकसुध्दा येत नसल्याने खर्च व उत्पन्न यात कोणताही ताळमेळ बसत नसल्याची स्थिती आहे.

एखाद्या जमीन मालकाची शेती दुसऱ्या एखाद्याने कसायला घेतली, तर पूर्वी येणाऱ्या पिकाचे दोन समान भाग केले जायचे. त्यास ग्रामीण भागात अरदल असे म्हणतात. पण आता चारपैकी तीन वाटे शेती कसणारा घेतो तर फक्त एक वाटा मालकाला मिळतो. त्यामुळे बऱ्याच ठिकाणी महागाईमुळे काही शेतमालकाची शेती ओसाड पडली आहे. तर जमिनीची चांगली मशागत करून चांगले पीक येत नसल्याने शेतकऱ्यांत चिंतेचे वातावरण निर्माण आहे.

**शेतीसाठी लागणाऱ्या साहित्यदरांत प्रचंड वाढ व मजुरांची मजुरी दिवसेंदिवस वाढत आहे. त्यात निसर्ग लहरी बनला आहे. दुसरीकडे खर्चाच्या तुलनेत उत्पन्न व बाजारभाव मिळत नसल्याने भातशेती करणे एक दिखावा उरला असून, वडीलोपार्जित शेती व परंपरा टिकवण्यासाठी नाईलाजाने भातशेती केली जात आहे.**

**-दत्तात्रेय पांडुरंग दिसले, शेतकरी केळवली, ता. खालापूर**

# मुरूडमध्ये शेतकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**मुरूड : प्रतिनिधी**

किसान क्रांती संघटनेने खास शेतकऱ्यांसाठी यशवंतनगर (उसरोली टेप) येथील छत्रपती शिवाजी नुतन विद्यालयात रविवारी (दि. ६) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत महाआरोग्य शिबिर आयोजित केले आहे. या शिबिरात नवी मुंबई, अलिबाग, मुरूड येथील तज्ज्ञ डॉक्टर शिबिरार्थींची आरोग्य तपासणी करणार आहेत. मुरूड तालुक्यातील सर्व शेतकरी बंधू-भगिनींनी तसेच गरजूंनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन संघटनेचे राज्य उपाध्यक्ष श्रीधर जंजिरकर यांनी केले आहे.

# महिला लोकशाही दिन

**अलिबाग : जिमाका**

महिलांचे प्रश्न तसेच समस्या सोडविण्यासाठी जिल्हास्तरावर महिन्याच्या तिसऱ्या तर तालुकास्तरावर महिन्याच्या चौथ्या सोमवारी महिला लोकशाही दिन राबविण्यात येतो.

सर्व स्तरातील समस्याग्रस्त व पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्काचे संरक्षण होवून त्यांना न्याय मिळावा या दृष्टीने महिलांच्या तक्रारी, अडचणींची सोडवणूक करण्यासाठी व पीडित महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सोय उपलब्ध व्हावी यासाठी महिला लोकशाही दिन राज्य, विभागीय, जिल्हा आणि तालुका पातळीवर राबविण्यात येतो.

रायगड जिल्हास्तरावर प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तालुकास्तरावर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी संबंधीत तहसीलदारांच्या अध्यक्षतेखाली तहसील कार्यालयात सकाळी ११ वाजता महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. यादिवशी सार्वजनिक सुट्टी आल्यास त्यानंतर येणाऱ्या कामकाजाच्या दिवशी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

महिला लोकशाही दिनात सहभागी होण्यासाठी समस्याग्रस्त व पीडित महिलांनी विहीत नमुन्यातील अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. अर्जाची आगाऊ प्रत महिला लोकशाही दिनाच्या १५ दिवस अगोदर पाठविणे आवश्यक आहे. या दिनात न्यायप्रविष्ठ प्रकरणे, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज, सेवा विषयक आस्थापना विषयक बावी, तक्रार, निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर ते अर्ज महिला लोकशाही दिनात स्वीकारले जाणार नाही.

महिला लोकशाही दिनाच्या तक्रारीबाबत अधिक माहितीकरिता जिल्हा परिविक्षा अधिकारी वाघमारे (भ्रमणध्वनी क्र. ९८३४७४६०६८) यांना संपर्क करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विनीत म्हात्रे यांनी केले आहे.



# कर्जत न. प. कर्मचाऱ्यांना २० हजार रुपये सानुग्रह अनुदान

## आरोग्य, पाणीपुरवठा, अतिक्रमणे या विषयावर गाजली सर्वसाधारण सभा

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेच्या मंगळवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त २० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता देण्यात आली. या सभेत विषय पत्रिकेवर नसलेल्या मात्र नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांवरही जोरात चर्चा झाली.

नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नगर परिषद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या सभेच्या विषय पत्रिकेवर १६ विषय ठेवण्यात आले होते. सुरुवातीस सभापती राहुल डाळींबकर यांनी, नगर परिषदेस स्वच्छता अभियानात देशात पाचवा क्रमांक मिळाल्याबद्दल सर्व सफाई कामगार, कर्मचारी, मुख्याधिकारी, नगरसेवक, उपनगराध्यक्ष, नगराध्यक्ष यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला, त्याला सर्वांनी अनुमोदन दिले. जिल्हाधिकाऱ्यांनी नगर परिषदेस अभिनंदनाचे पत्र पाठवले आहे, त्याचे वाचन करण्यात आले.


विषय पत्रिकेवरील सन २०२२ करिता कर्मचाऱ्यांना दिवाळीपूर्व सानुग्रह अनुदान मिळावे, हा विषय सभागृहात चर्चेला आला. त्यावर नितीन सावंत, राहुल डाळींबकर, स्वामिनी मांजरे, उमेश गायकवाड या सदस्यांनी चर्चा केली. कर्मचाऱ्यांना २० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याचे सर्वांनी मान्य केले.

विषय पत्रिकेवरील विषयांवरील चर्चा संपल्यानंतर बळवंत घुमरे यांनी नगर परिषद हद्दीत रोज अतिक्रमणे होत आहेत, त्यावर प्रशासनाचा अंकुश राहिला नाही, असे सांगितले. रोज नविन टपऱ्या होत आहेत, बाजार पेठेतील रस्ता फेरीवाल्यांनी अडवला आहे. त्यामुळे नागरिकांना चालणे कठीण झाले आहे. रोज वाहतूकीस अडथळा होत आहे. रस्त्यालगत कचरा टाकला जात आहे, त्याकडे सफाई कर्मचारी दुर्लक्ष करीत आहेत. शहरात अनेक ठिकाणी कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. कर्मचारी अतिक्रमण रोखण्यासाठी जात असतात मात्र त्याठिकाणी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका यांची नावे सांगितली जातात, हे बरोबर नाही. असे नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी सांगितले. त्यावर मुख्याधिकारी वैभव गारवे यांनी संबंधित कर्मचाऱ्यांना सभागृहातच समज दिली. यापुढे अनधिकृत बांधकामे, बाजार पेठेतील फेरीवाल्यांवर धडक कारवाई केली जाईल, असे मुख्याधिकारी गारवे यांनी सभागृहात सांगितले मात्र कारवाई होत असताना लोकप्रतिनिधींनी आम्हाला फोन करू नये, अशी विनंती केली. त्यावेळी सभागृहाने सर्वानुमते मान्य केले आहे.

उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, नगरसेविका संचिता पाटील, प्राची डेरवणकर, विशाखा जिनगरे, वैशाली मोरे, मधुरा चंदन, भारती पालकर, ज्योती मेंगाळ, पुष्पा दगडे, सुवर्णा निलधे, स्वामिनी मांजरे, नगरसेवक विवेक दांडेकर, शरद लाड, उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे, संकेत भासे, हेमंत ठाणगे या सर्वसाधारण सभेला उपस्थित होते.

# बालविवाहमुक्त भारत अभियानाला रायगड जिल्ह्यात उदंड प्रतिसाद

**रॅलीत महिलांचा उत्स्फूर्त सहभाग**




**पेण : प्रतिनिधी**


नोबेल शांती पुरस्कार प्राप्त कैलास सत्यार्थी यांच्या पुढाकाराने देशात बालविवाह मुक्त भारत अभियान राबवले जात आहे. रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यातून कॅण्डल रॅली काढून बालविवाह मुक्त भारत अभियान जनजागृती करण्यात येत आहे. या रॅलीत महिलांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला होता.

पेण येथील महाराष्ट्र सामाजिक विकास संस्था, सोहम फाउंडेशन-पनवेल व सोशल एम्पावरमेंट अँड व्हालेंटरी असोसिएशन-मुंबई यांच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यात १६ ऑक्टोबरपासून बालविवाह मुक्त भारत अभियान राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील पनवेल, पेण, कर्जत, खालापूर, उरण, अलिबाग, सुधागड, माणगाव, रोहा, मुरूड, श्रीवर्धन, म्हसळा, महाड, पोलादपूर, आणि तळा तालुक्यात तसेच मिरगुंड आदिवासीवाडी (ता. माणगाव ), खरीवली आदिवासीवाडी (ता. खालापूर), किहीम आदिवसीवाडी (ता. अलिबाग) व विविध शाळा, कॉलेजमधून कॅन्डल मार्चच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली.

बालविवाह प्रथा करूया नष्ट, 'पहिले पढाई, फिर बधाई', 'चलो अब शुरुवात करे बालविवाह को नष्ट करे' असे नारे देत प्रतिबंधाबाबत जनजागृती करण्यात येत आहे. बालविवाह बाबतच्या कायद्याची अंमलबजावणी व महत्त्व पालकांना पटवून देण्यात येते. रॅलीची सांगता भारत बाल विवाह मुक्त बनावा ही शपथ सर्व पालकांना देऊन करण्यात येते.

महाराष्ट्र समाज विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मनोज गावंड यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रम समन्वयक पंकज पाटील व संस्थेचे कर्मचारी, सोहम फाउंडेशनच्या अध्यक्षा मंजिरी मुळे व त्यांचे सहकारी यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, अशा वर्कर, अंगणवाडी सेविका, बचत गटांच्या महिला सदरचे अभियान यशस्वी करण्याकरिता मेहनत घेत आहेत.

# माणगाव टिएमसी कॉलेजमध्ये पालक सभा



**माणगाव : प्रतिनिधी**

जे. बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या माणगाव येथील टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये मंगळवारी (दि.१८) सकाळी विद्यार्थी, शिक्षक व पालक संघटनेची सभा उत्साहात संपन्न झाली. विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख प्रा. अशोक मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती यावेळी पालकांना देण्यात आली. डॉ. चंद्रकांत माळी यांनी राष्ट्रीय सेवा योजना व क्रीडा विषयक माहिती दिली. ग्रंथालयातील दैनिकांची संख्या तसेच सॉफ्टवेअर व ऑनलाइन पुस्तकांविषयी ग्रंथपाल अमित बाकाडे यांनी माहिती दिली. प्रा. अशोक मोरे यांनी स्पर्धा परीक्षा, करिअर कट्टा व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमधील विद्यार्थ्यांचा सहभाग व यश याबद्दल तसेच संजय गायकवाड यांनी विविध शासकीय व निमशासकीय शिष्यवृत्तीविषयी माहिती दिली. मुख्य लिपिक दिलीप ढेपे यांनी सर्व परीक्षांचे निकाल व प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांची माहिती दिली. यानंतर पालकांनी आपले मनोगत व्यक्त करून काही सूचना केल्या. विद्यार्थ्यांनीही काही सूचना मांडून शंका उपस्थित केल्या. त्याबद्दल प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी यांनी सकारात्मक निर्णय घेण्याचे मान्य केले. प्रा. अशोक मोरे यांनी आभार मानले.

# पाकच्या धमकीला घाबरण्याची गरज नाही

## क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांचे पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाला प्रत्युत्तर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतामध्ये वर्ल्ड कप न खेळवण्याच्या पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाच्या धमकीवर क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी मोठे वक्तव्य केले आहे. पुढील वर्षी भारतात होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत प्रत्येक मोठा संघ खेळायला येणार असल्याचे अनुराग ठाकूर यांनी थेट सांगितले.

एकदिवसीय विश्वचषकातून बाहेर पडण्याच्या पाकिस्तानच्या धमकीला प्रत्युत्तर देताना क्रीडामंत्री अनुराग ठाकूर यांनी म्हटले आहे की, बीसीसीआयचे उत्तर देईल आणि २०२३चा एकदिवसीय विश्वचषक भारतातच होणार आहे. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी आशिया चषक पाकिस्तानमधून हलवण्याबाबत केलेल्या टिप्पणीनंतर पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने एकदिवसीय विश्वचषकातून बाहेर पडण्याची धमकी दिली होती. बीसीसीआयच्या बैठकीनंतर सचिव जय शाह यांनी आशिया चषक दुसऱ्या ठिकाणी आयोजित करण्याबाबत भाष्य केले होते.

पीसीबीच्या ब्लॅकमेल पत्राला बीसीसीआय उत्तर देईल, असे केंद्रीय क्रीडा मंत्री अनुराग ठाकूर यांनी सांगितले आहे. यासोबतच एकदिवसीय विश्वचषक नक्कीच भारतात होणार आहे. हा बीसीसीआयचा विषय आहे आणि बोर्ड त्याला उत्तर देईल. पुढील



वर्षीही विश्वचषक होणार असून जगभरातील संघही खेळणार आहेत. भारताची अशी परिस्थिती आहे की, त्याला कोणाचेही ऐकण्याची गरज नाही. पाकिस्तान पुढील वर्षी आशिया चषक स्पर्धेचे यजमानपद भूषवणार आहे. योगायोगाने जय शाह हे आशियाई क्रिकेट परिषदेचे अध्यक्ष आहेत. पाकिस्तानमधील आशिया चषक स्पर्धेच्या आयोजनाबाबत जय शाह म्हणाले होते की, आशिया चषक २०२३ तटस्थ ठिकाणी होणार आहे. आमच्या संघाला पाकिस्तानात जाण्याची परवानगी द्यायची की, नाही हे भारत सरकार ठरवते, त्यामुळे आम्ही त्यावर भाष्य करणार नाही.

ऑस्ट्रेलियात १६ ऑक्टोबरपासून टी-२० विश्वचषक स्पर्धेला सुरुवात झाली आहे. सध्या पात्रता सामने खेळले जात आहेत. टीम इंडियाचा पहिला सामना २३ ऑक्टोबरला पाकिस्तानविरुद्ध खेळायचा आहे. दिवाळीच्या एक दिवस आधी हा सामना खेळवला जाणार आहे.

# राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे यश



**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्यस्तरीय सब ज्युनिअर तलवारबाजी अजिंक्यपद स्पर्धा अहमदनगर येथे ८ ते १० ऑक्टोबरदरम्यान झाल्या. स्पर्धेत २५ जिल्ह्यातील शाळांतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उज्ज्वल यश प्राप्त केले आहे.

वैयक्तिक गटात जन्नत त्रिपाठी हिस सुवर्ण पदक आणि जास्मिन त्रिपाठी हिने कांस्यपदक पटकावून राष्ट्रीय स्पर्धेसाठी या दोघी पात्र ठरल्या आहेत.

सांघिक गटात जन्नत त्रिपाठी रजत व कांस्यपदक, जास्मिन त्रिपाठी रजत पदक, हर्ष पाटील रजत पदक, आयुषी वर्मा कांस्यपदक, आर्या दिवेकर हिने कांस्यपदक पटकाविले.

मुलींच्या गटात रायगड असोसिएशनला जनरल चॅम्पियनशिप तृतीय क्रमांक त्याचबरोबर ट्रॉफी मिळाली. यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या स्वप्नील मोरे यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी विशेष कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नवी मुंबई पालिका शाळांतील विद्यार्थी लुटताहेत फिफाचा आनंद

**नवी मुंबई : बातमीदार**

यावर्षी १७ वर्षांखालील महिला फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धा भारतात होत असून नवी मुंबई हेदेखील या स्पर्धेचे यजमान शहर आहे. नवी मुंबई महापालिकेने आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनानुसार, मनपा शाळांमधील इ. ५ वी ते १० वीच्या पाच हजाराहून अधिक विद्यार्थ्यां डॉ. डि. वाय. पाटील स्टेडियम येथे सामने बघण्याची संधी उपलब्ध करून दिली.

महानगरपालिका शाळेतील या मुलांना शाळेपासून स्टेडियमपर्यंत नेण्यासाठी व सामने संपल्यानंतर स्टेडियमपासून शाळेपर्यंत जाण्यासाठी परिवहन




व्यवस्थापक तथा शिक्षण विभागाचे उपायुक्त योगेश कडुसकर यांच्यामार्फत व्यवस्था करण्यात आली. क्रीडा विभागाचे उपायुक्त सोमनाथ पोटरे यांच्या नियंत्रणाखाली क्रीडा अधिकारी रेवप्पा गुरव आणि विभागामार्फत मुलांच्या अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली.

मुलांमध्ये खेळाची आवड वाढीस लागावी याकरिता मुलांना विनामूल्य सामने बघण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. या मुलांसाठी स्टेडियममध्ये स्वतंत्र स्टँडमध्ये बैठक व्यवस्था करण्यात आली. त्याचप्रमाणे खासगी शाळांतील विद्यार्थ्यांनाही सामने बघण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

या मुलांना नेण्या-आणण्याचे सुयोग्य नियोजन करण्यात आले असून वाहतूक पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या नियंत्रणाखाली विद्यार्थ्यांच्या बसेसच्या पार्कींगची योग्य व्यववस्था करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे स्वतंत्र बस मार्गिका कार्यान्वित ठेवण्यात आलेली आहे.

# जागतिक नेमबाज रुद्रांक्ष पाटीलचा गौरव

## मुख्यमंत्र्यांकडून दोन कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर



**मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक नेमबाजी स्पर्धेत सुवर्णपदक पटकविणाऱ्या रुद्रांक्ष बाळासाहेब पाटील यास रोख दोन कोटी रुपये देण्याचे गुरुवारी (दि. २०) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केले.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रुद्रांक्षचे अभिनंदन केले असून राज्य मंत्रिमंडळानेही त्याच्या अभिनंदनाचा ठराव केला.

कैरो येथे झालेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेतील दहा मीटर रायफल्स स्पर्धेत भारताचा नेमबाज रुद्रांक्ष पाटीलने वैयक्तिक स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले. त्याबद्दल बैठकीच्या सुरुवातीला मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी रुद्रांक्ष पाटीलने केलेल्या कामगिरीची माहिती दिली. २०२४ला फ्रान्समध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धेचा पहिला कोटा त्याला मिळाला आहे. रुद्रांक्ष पाटील याच्या या कामगिरीमुळे त्याचे कौतुक केले जात आहे. वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी त्याने ही कामगिरी केली आहे.

# डेन्मार्क खुली बॅडमिटन स्पर्धेत लक्ष्य, प्रणॉयची आगेकूच

**ओडेन्स : वृत्तसंस्था**

भारताच्या लक्ष्य सेन आणि एच. एस. प्रणॉय यांनी डेन्मार्क खुल्या बॅडिमटन स्पर्धेत आपापल्या सामन्यात चमकदार विजयासह पुरुष एकेरीची उपउपांत्यपूर्व फेरी गाठली. महिला एकेरीत सायना नेहवालचे आव्हान पराभूत झाल्याने संपुष्टात आले.

लक्ष्य सेनने इंडोनेशियाच्या अ‍ॅन्थनी गिंटिंगचे आव्हान २१-१६, २१-१२ असे सहज मोडून काढले. सामन्याच्या सुरुवातीपासून चांगल्या लयीत असलेल्या लक्ष्यने गिटिंगविरुद्ध चांगला खेळ केला. पहिल्या गेममध्ये गिंटिंगने आव्हान



उपस्थित करण्याचा प्रयत्न केला, मात्र लक्ष्यने उत्कृष्ट फटकांच्या साहाय्याने गेम जिंकला. दुसऱ्या गेममध्येही त्याने हीच लय कायम राखत गेमसह सामन्यात विजय मिळवला. अन्य सामन्यात, एच. एस. प्रणॉयने चीनच्या झाओ जुन पेंगचा २१-१३, २२-२० असा पराभव केला. पहिल्या गेममध्ये फारसे आव्हान न मिळालेल्या प्रणॉयसमोर दुसऱ्या गेममध्ये पेंगकडून प्रतिकार सहन करावा लागला, मात्र आपला खेळ उंचावत प्रणॉयने विजय नोंदवला.

महिला एकेरीत सायना नेहवालला चीनच्या झांग यी मानकडून तीन गेमच्या लढतीत १७-२१, २१-१९, ११-२१ असा पराभव पत्करावा लागला. पुरुष दुहेरीत सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी-चिराग शेट्टी जोडीने दक्षिण कोरियाच्या कांग मिन ह्यूक-सेओ सेऊंग जाए जोडीचा २१-१५, २१-१९ असा सरळ दोन गेममध्ये पराभव केला.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल राष्ट्रीय कराटे स्पर्धेत विजयी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

वर्ल्ड फनकोसी शोतोकान कराटे ऑर्गनायझशनतर्फे आयोजित स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघरच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विजेते पद पटकाविले.

विजेतेपद पटकाविणारे विद्यार्थी वैष्णवी साळुंखे प्रथम (१७ वर्षांखालील गट), सुमेध राजाराम प्रथम क्रमांक (१७ वर्षांखालील गट), अथर्व पवार तृतीय (१० वर्षांखालील गट) यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना वर्ल्ड फुनकोसी शोतोकान कराटे ऑर्गनायझशनतर्फे योग्यता प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या यशवंत शेळके व अब्दुल सिद्दीकी यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी विशेष कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वर्ल्डकपमध्ये भारताला केवळ 30 टक्के संधी -कपिल देव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टी-२० वर्ल्डकप स्पर्धेत भारतीय संघाच्या प्रवासाला २३ ऑक्टोबरला पाकिस्तानविरुद्धच्या सामन्याने सुरुवात होणार आहे. रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ १५ वर्षांचा टी-२० वर्ल्डकप जिंकण्याचा दुष्काळ संपवेल अशी अनेकांना आशा आहे. १९८३च्या वर्ल्डकप विजेते कर्णधार कपिल देव यांचे मत काही वेगळे आहे. या स्पर्धेची फायनल सोडा, उपांत्य फेरी गाठणेही भारतासाठी अवघड असल्याचे मत कपिल देव यांनी व्यक्त केले.

कपिल देव म्हणाले, टी-२० क्रिकेटमध्ये आज जिंकणारा संघ पुढचाच सामना हरू शकतो. त्यामुळे भारतीय संघाच्या



वर्ल्डकप विजयाच्या शक्यतेबाबत सांगणे अवघड आहे. ते उपांत्य फेरीत तरी प्रवेश करतील का याबाबतही माझ्या मनात शंका आहे. माझ्यासाठी भारताला उपांत्य फेरीत प्रवेश करण्याची ३० टक्केच संधी आहे.

कपिल देव यांनी या वेळी जसप्रीत बुमराहच्या जागी मोहम्मद शमीच्या निवडीवरही मत व्यक्त केले. मोहम्मद शमी चांगला गोलंदाज आहे आणि रोहित शर्मा सामन्यात त्याचा कसा वापर करतो यावर अवलंबून आहे. जलदगती गोलंदाजांसाठी दुखापत ही खूप मोठी समस्या बनली आहे, तर सूर्यकुमार यादव हा भविष्यातील प्रभावशाली फलंदाज बनेल, असा विचार कुणी केला नसावा, परंतु त्याने कठोर परिश्रमाच्या जोरावर आपली छाप पाडली. आता भारतीय संघाचा त्याच्याशिवाय विचार केला जाऊ शकत नाही.

### भारत जिंकणार -सचिन तेंडुलकर

माजी कर्णधार कपिल देव यांनी नकारात्मक सूर लावला असताना मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरने 'टेलिग्राफ'ला दिलेल्या मुलाखतीत भारत बाजी मारेल असे म्हटले आहे. तो म्हणाला, टीम इंडियाच फेव्हरिट आहे. माझे मन हे नेहमीच भारताच्या बाजूने आहे आणि भारतानेच विजय मिळवावा असे नेहमी वाटते. मी भारतीय आहे म्हणून हे बोलत नाही, तर ऑस्ट्रेलियातील खेळपट्ट्यांवर भारतीय संघ वर्चस्व गाजवेल याचा मला विश्वास आहे. त्यामुळे या वेळी भारतीय संघ विजय मिळविले.

# ऑस्ट्रेलियन विश्वचषक संघात कॅमेरॉन ग्रीनची एन्ट्री



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

ऑस्ट्रेलियाचा बॅकअप यष्टिरक्षक जोश इंग्लिसच्या हाताला दुखापत झाल्याने, तो टी-२० विश्वचषकातून बाहेर पडला आहे. त्यामुळे जखमी जोश इंग्लिसच्या जागी ऑस्ट्रेलियन संघात कॅमेरॉन ग्रीनचा समावेश करण्यात आला आहे. ग्रीन हा उत्तम अष्टपैलू खेळाडू आहे. त्याला टी-२० विश्वचषकासाठी ऑस्ट्रेलियन संघात का स्थान देण्यात आले नाही, यावर सतत चर्चा होत होती.

सिडनीमध्ये बुधवारी गोल्फ खेळताना यजमान ऑस्ट्रेलियाचा बॅकअप यष्टिरक्षक इंग्लिसच्या हाताला दुखापत झाली आहे. ज्यामुळे अष्टपैलू कॅमेरॉन ग्रीनला त्याच्या जागी संधी मिळाली आहे. अष्टपैलू कॅमेरॉन ग्रीनने नुकत्याच झालेल्या भारत दौऱ्यात आपल्या खेळाने सर्वांना प्रभावित केले होते.

कॅमरॉन ग्रीनने आतापर्यंत ऑस्ट्रेलियासाठी १४ कसोटी, १२ एकदिवसीय आणि सात टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. सात टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ग्रीनने १९.४२च्या सरासरीने आणि १७४.३५ च्या स्ट्राइक रेटने १३६ धावा केल्या आहेत. ज्यामध्ये दोन अर्धशतकांचा समावेश आहे. ग्रीनने पाच टी२० आंतरराष्ट्रीय विकेट्सही घेतल्या आहेत. तो मोठे फटके खेळण्यात पटाईत आहे.

# टी-२० रँकिंगमध्ये सूर्या, रिझवान आणि बाबर यांच्यात चुरस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयसीसीने पुरुषांची टी-२० क्रमवारी जाहीर केली आहे. टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर १२ टप्पा सुरू होण्यापूर्वीच जाहीर केलेल्या क्रमवारीत बांगलादेशचा अष्टपैलू खेळाडू आणि कर्णधार शाकीब अल हसनला खूप मोठा फायदा झाला. अष्टपैलू क्रमवारीमध्ये बांग्लादेशच्या शाकीब अल् हसनने पुन्हा एकदा पहिले स्थान मिळवले आहे. टीम इंडियाचा विचार करता स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव दुसऱ्या स्थानी कायम असून विश्वचषकानंतर तो नक्कीच पहिले स्थान मिळवू शकतो.

पहिल्या स्थानाचा विचार करता पाकिस्तानता मोहम्मद रिझवान नंबर एकवर असून



गोलंदाजांमध्ये जोश हेझलवुड विराजमान आहे. फलंदाजांच्या क्रमवारीत अव्वल स्थानावर कोणताही बदल झालेला नसून पाकिस्तानी फलंदाज मोहम्मद रिझवानने भारताच्या सूर्यकुमार यादवच्या तुलनेत आपले स्थान मजबूत केले आहे. रिझवानला तिरंगी मालिकेतील कामगिरीचा फायदा झाला आणि आता त्याचे ८६१ रेटिंग गुण आहेत, सुर्यकुमार यादवने २३ गुणांची कमाई करत ८३८ गुण खात्यात जमा केले तर बाबर आझम ८०८ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. अव्वल १०च्या क्रमवारीत फक्त एक बदल झाला असून न्यूझीलंडचा स्टार फलंदाज ग्लेन फिलिप्स १३ स्थानांनी झेप घेत १०व्या स्थानावर पोहचला आहे.

अष्टपैलूंच्या क्रमवारीत नामिबियाचा जेजे स्मित चौथ्या स्थानावर गेला आहे. श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या सामन्यात स्मितने शानदार प्रदर्शन केले होते. दुसरीकडे, झिम्बाब्वेचा अनुभवी सिकंदर रझालाही चार स्थानांचा फायदा झाला असून तो आता सातव्या क्रमांकावर आहे. पहिल्या दहामध्ये गोलंदाजांच्या क्रमवारीतही काही बदल करण्यात आले आहेत. अफगाणिस्तानचा फिरकीपटू मुजीब-उर-रहमान दोन स्थानांनी पुढे पाचव्या तर दक्षिण आफ्रिकेचा फिरकी गोलंदाज केशव महाराज आठव्या क्रमांकावर पोहचला आहे. दुसरीकडे, ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज जोश हेजलवूड ७०५ गुणांसह पहिल्या स्थानावर आहे.

# एकदिवसीय कसोटी मालिकेसाठी टीम इंडिया करणार बांगलादेशचा दौरा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघ २०१५नंतर प्रथमच बांगलादेशचा दौरा करणार आहे. दोन्ही संघात ४ डिसेंबरपासून तीन एकदिवसीय आणि दोन कसोटी सामन्यांसाठी करणार आहे, अशी घोषणा बांगलादेश क्रिकेट बोर्डाने (बीसीबी) गुरुवारी (दि. २०) केली. एकदिवसीय सामने ४, ७ आणि १० डिसेंबर रोजी मीरपूर, ढाका येथील शेर-ए-बांगला राष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळवले जातील.

कसोटी सामने आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपचा भाग असणार आहेत. भारत आणि बांगलादेश संघातील कसोटी मालिकेतील पहिला सामना १४ ते १८ डिसेंबरदरम्यान चट्टोग्राम येथे खेळला जाईल. तसेच २२ ते २६ डिसेंबर दरम्यान दुसऱ्या आणि शेवटच्या कसोटी सामना ढाका येथे पार पडेल. बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी मालिकेच्या महत्त्वावर भर दिला. ते म्हणाले, भारत-बांगलादेश सामन्यांची चाहत्यांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com